औरंगाबाद, नागपूर, पुणे, अमरावती, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, जळगांव, रत्नागीरी, ठाणे, पालघर, नंदुरबार, नांदेड, चंद्रपूर, गडचिरोली, अहमदनगर, सातारा या विभागातून एकाच वेळी प्रकाशीत होणारे वृत्तपत्र

माहिती खात्रीची व प्रगतीची, देतो वेध भविष्याचा..

# नौकरी एक्सप्रेस

Marathi-Weekly

RNI.No.MAH/MAR2010/34125

छत्रपती संभाजीनगर

पाने : ८

किंमत : १५.००

वर्ष : १५ वे

अंक : ४१ वा

रविवार - ०१ ते ०७ जून २०२५

E-mail:naukriexpress.impact@gmail.com | E-Paper : http://naukriexpress.co.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-415/2024-26 | किंमत १५/-

-NTPC १२० उपव्यवस्थापक पदाकरीता भरती

-South Asian University, दिल्लीमध्ये प्रवेश सुरु

-राष्ट्रपतींच्या हस्ते जळगावच्या सुजाता बागुल यांचा राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने सन्मान

सविस्तर वृत्त पान क्र.७ वर

-साऊथ इंडियन बँक लिमिटेडमध्ये भरती

-१२ वी नंतर कॉमर्समध्ये करा करिअर

पंजाब अॅण्ड सिंध बँकेत रिलेशनशिप मॅनेजर भरती

यश मिळण्यासाठी अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो

मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अर्जाची ऑनलाईन १५ जूनपासून सुरु

सविस्तर वृत्त पान क्र.६ वर

दहावी-बारावीतील गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणार ३० हजारांचं रोख पारितोषिक

NEET PG 2025: परीक्षा होणार एकाच सत्रात

यशासाठी प्रतिसादही महत्त्वाचा

आयटीआय प्रवेश प्रक्रियेसाठी कधी सुरुवात होणार?

सविस्तर वृत्त पान क्र.४-३ वर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा १ जून, २०२५ ला

विद्यार्थ्यांमध्ये तेवढीच लोकप्रियता असलेली ज्ञानशाखा म्हणजे इंजिनिअरिंग.

KGMU नर्सिंग ऑफिसर ७३३ पदांसाठी भरती

महाराष्ट्रातील सहा मान्यवर पद्म पुरस्काराने सन्मानित

# भारतीय सशस्त्र दलात अधिकारी होण्याची तयारी आता मोफत!

**नौकरी एक्सप्रेस**

**नाशिक/प्रतिनिधी/** भारतीय सशस्त्र दलात अधिकारी होण्याचे स्वप्न पाहताय? यासाठी लागणारी तयारी आता मोफत करवण्यात येणार आहे.त्यासाठी नाशिकमध्ये प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.भारतीय सैन्यदल, नौदल व हवाई दलामध्ये अधिकारी म्हणून भरती होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या महाराष्ट्रातील तरुण-तरुणींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे कंम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिसेस (CDS) परीक्षेची पूर्व तयारी करण्यासाठी विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## नाशिकमध्ये प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



हे प्रशिक्षण CDS कोर्स क्र. ६५ या नावाने ओळखले जाते आणि दि. १६ जून २०२५ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रशिक्षणार्थींना निवास, भोजन व प्रशिक्षण मोफत दिले जाणार आहे.

हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना UPSC मार्फत घेतल्या जाणाऱ्या CDS परीक्षेची शिस्तबद्ध व व्यावसायिक तयारी करण्याची संधी देते.

मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांसाठी दि. ५ जून २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग, पुणे (DSW) यांच्या अधिकृत संकेतस्थळावरून CDS-65 कोर्ससाठी अर्ज करून प्रवेशपत्र आणि आवश्यक परिशिष्टे भरून, त्याचे प्रिंटआउट घेऊन मुलाखतीस उपस्थित राहावे. या प्रशिक्षणासाठी अर्ज करताना उमेदवार किमान पदवीधर असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने UPSC च्या CDS परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज केलेला असावा. ही पात्रता अनिवार्य असून, संबंधित पुरावे प्रशिक्षण वर्गाला उपस्थित राहतेवेळी सादर करावे लागतील.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्याशी खालील माध्यमांद्वारे संपर्क साधावा:

ईमेल: training. pctenashikgmail.com

**दूरध्वनी: ०२५३-२४५१०३२**

**व्हॉट्सअॅप: ९१५६०७३३०६**

उमेदवारांनी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किंवा फोनद्वारे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई शहर यांनी केले आहे. अधिक माहीतीसाठी जाहीर करण्यात आलेल्या जाहीरातीचा आढावा घेण्यात आला आहे.

# IMF कडून कोणता देश घेतो सर्वाधिक कर्ज?

**भारत किती घेतो कर्ज? पाकिस्तानचा कितवा नंबर?**

२२ एप्रिलला जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत दहशतवाद्यांचे तळ उद्धवस्त केले होते. तसेच पाकिस्तान विरोधात कठोर कारवाईला देखील सुरुवात केली आहे. या काळात खचऋने पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात कर्ज दिले होते. याची जोरदार चर्चा झाली होती. दरम्यान, खचऋ कडून सर्वाधिक कर्ज कोणता देश घेतो? याबाबतची माहिती तुम्हाला आहे का? जाणून घेऊयात सविस्तर माहिती.

## 'या' देशांवर सर्वाधिक कर्ज

आयएमएफकडून कर्ज घेण्याच्या बाबतीत अर्जेंटिना अव्वल स्थानावर आहे. त्यानंतर युक्रेनचा क्रमांक लागतो, आयएमएफला त्यांची एकूण देणी ही १०.७ अब्ज एसडीआर आहेत. त्याच वेळी, इजिप्तवर ८.२ अब्ज, पाकिस्तानवर ६.९ अब्ज आणि इक्केडोरवर ६.४ अब्ज कर्ज आहे. पाकिस्तानचा कर्ज घेण्याच्या बाबतीत चौथा क्रमांक लागतो.

ऑपरेशन सिंदूर नंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये निर्माण झालेला तणाव. त्यानंतर, सर्वात जास्त बातम्यांमध्ये राहिलेल्या गोष्टींपैकी एक म्हणजे आयएमएफने पाकिस्तानला १ अब्ज डॉलर्सचे दिलेले कर्ज. पाकिस्तान मुख्यत्वे आयएमएफच्या भीक मागण्यावर अवलंबून आहे. परंतु जगात असे काही देश आहेत जे पाकिस्तानपेक्षा आयएमएफकडून जास्त कर्ज घेतात. भारताने आयएमएफकडून किती कर्ज घेतले आहे ते सांगूया. ६० टक्के कर्ज ९० पैकी फक्त ५ देशांना दिले जाते

आयएमएफ जगातील देशांना त्यांची आर्थिक स्थिती सुरळीत




राखण्यासाठी आर्थिक मदत करते. आयएमएफच्या मते, जगातील ९१ देशांना दिलेल्या कर्जांपैकी ६० टक्के कर्ज फक्त ५ देशांना दिले जाते, ज्यामध्ये अर्जेंटिनाचा प्रथम क्रमांकावर आहे.

अर्जेंटिना हा देश आयएमएफ कडून मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतो. अर्जेंटिनाचा आयएमएफकडून कर्ज घेण्यात जगात पहिला क्रमांक लागतो.

**कर्ज घेण्यात भारत ३१ व्या स्थानावर**

भारतानेही आयएमएफकडून कर्ज घेतले आहे. आयएमएफकडून कर्ज घेण्याच्या यादीत भारत खूपच खालच्या स्थानावर आहे. एकीकडे, पाकिस्तान चौथ्या क्रमांकावर आहे तर दुसरीकडे, भारत ३१ व्या क्रमांकावर आहे. अहवालांनुसार, भारताचे थकित कर्ज एसडीआर १.९८ अब्ज आहे.

एसडीआर म्हणजे काय?

एसडीआर ही आयएमएफची विशेष राखीव मालमत्ता आहे, ज्याचे मूल्य पाच प्रमुख चलनांच्या आधारे निश्चित केले जाते. अमेरिकन डॉलर, युरो, चिनी रॅन्मिन्बी, जपानी येन, ब्रिटिश पाउंड.

# कला अणि कॉमर्स विद्यार्थीही बनू शकतात Pilot?

भारतातील विद्यार्थ्यांसाठी एक ऐतिहासिक बदल घडवण्याच्या दिशेने DGCA (डायरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशन) मोठं पाऊल उचलत आहे.पायलट ट्रेनिंगसाठी आजवर फक्त विज्ञान शाखेतील म्हणजे फिजिक्स आणि मॅथ्स शिकलेल्या विद्यार्थ्यांनाच कमर्शियल पायलट लायसन्स (CPL) साठी पात्र मानले जात होते. पण आता हे चित्र बदलण्याची शक्यता आहे.DGCA च्या नवीन प्रस्तावानुसार, आर्ट्स आणि कॉमर्स शाखेतील विद्यार्थीही पायलट ट्रेनिंगसाठी पात्र ठरू शकतील.

१९९० च्या दशकात DGCA ने पायलट होण्यासाठी विज्ञान शाखेतील विषयांना बंधनकारक केलं होतं. त्यामुळे इतर शाखेतील विद्यार्थ्यांना ओपन स्कूलिंगद्वारे फिजिक्स आणि मॅथ्सचे पेपर देऊन पात्रता मिळवावी लागत होती. मात्र, सध्या हाच नियम बदलण्यासाठी प्रस्ताव नागरिक उड्डयन मंत्रालयाकडे पाठवण्यात आला आहे. मंजुरी मिळाल्यास, कोणत्याही शाखेतील १२ वी पास विद्यार्थी पायलट प्रशिक्षणासाठी अर्ज करू शकतील.

## नियमांमध्ये करण्यात आले बदल

हा बदल केवळ शैक्षणिक अडथळे दूर करणार नाही, तर महिलांसह ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांसाठी एव्हिएशन करिअरचे दरवाजे खुले करणार आहे. या निर्णयामुळे देशभरातील फ्लाइंग स्कूल्समध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. यासाठी उऋछ- ने सर्व प्रशिक्षण संस्थांना विमानांची संख्या, प्रशिक्षकांची पात्रता, सिम्युलेटरची उपलब्धता, ट्रेनिंग कालावधी यासारखी माहिती त्यांच्या वेबसाइटवर स्पष्टपणे देण्याचे निर्देश दिले आहेत.

या निर्णयामुळे केवळ टॅलेंट पूल वाढणार नाही, तर इंडस्ट्री अधिक समावेशक होईल. मात्र, पायलट ट्रेनिंग अजूनही अत्यंत तांत्रिक, शिस्तबद्ध आणि जबाबदारीची मागणी करणारी प्रक्रिया असेल. त्यामुळे वैद्यकीय फिटनेस आणि इतर आवश्यक अटी पूर्ण करणं आवश्यक आहे. DGCA च्या या पॉलिसी अपडेट्सकडे आता संपूर्ण देशाचं लक्ष लागलेलं आहे. या पॉलिसीमुळे अनेक इतर क्षेत्रातील विद्यार्थी या करिअर पर्यायाकडे आकर्षित होत आहेत. तसेच या निर्णयाने वाणिज्य




आणि कला क्षेत्रातील अनेक विद्यार्थ्यांना एव्हिएशन क्षेत्रात येण्याचे आणि करिअर घडवण्याचे खुले निमंत्रण दिले आहे, तसेच मोठ्या प्रमाणात विद्यार्थी या निर्णयाचे जल्लोषात स्वागत करत एव्हिएशनमध्ये करिअर घडवतील अशी अपेक्षा उऋछ- ने वर्तवली आहे.

# कॉन्स्टेबल Exam नापास; आता पठ्ठ्या झाला IPS

राजस्थानच्या प्रेमसुख डेलू यांनी अपयशातून हार न मानता १२ सरकारी परीक्षा दिल्या आणि अखेर UPSC मध्ये यश मिळवून IPS अधिकारी बनले. त्यांचा प्रवास प्रत्येक जिद्दी तरुणासाठी प्रेरणादायी आहे. प्रेमसुख डेलू एका गरीब शेतकरी कुटुंबातील अतिशय सामान्य मुलगा! बाबा शेतकरी तर आई गृहिणी, मोठ्या बहिणीला तर शिक्षणही घेता आले नाही. वडील शेती करत आणि उंट हाकलत, या कामांवर प्रेमसुखाचा कुटुंब चालत होते. आर्थिक अडचणींचा परिणाम त्यांच्या आयुष्यवर मोठा होत होता. तरी यातून सांभाळून त्यांनी २०१० मध्ये पदवी घेतली.

## ६ वर्षात केल्या १२ सरकारी नोकऱ्या!

त्यानंतर पटवारी परीक्षा पास केली आणि सरकारी नोकरीत पहिले पाऊल टाकले. प्रेमसुख डेलूने नोकरी करत असतानाही आपले स्वप्न मात्र मोठं ठेवलं UPSC! त्यांनी अनेक परीक्षा दिल्या. दरम्यान, ग्रामसेवक परीक्षा त्यांनी दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण केली. राजस्थान पोलीस उपनिरीक्षक (SI) पदासाठीही त्यांची निवड झाली. मात्र त्यांनी सहायक जेलर म्हणून सेवा स्वीकारली. त्यानंतर त्यांनी तहसीलदार, शाळेतील व्याख्याता आणि महाविद्यालयीन लेक्चरर अशा विविध पदांवर काम केलं. या सगळ्या सरकारी नोकऱ्या करत करत, त्यांनी णझडउ सिव्हिल सेवा परीक्षेसाठी पुन्हा तयारी केली. या तयारीला



चिकाटी, सातत्य आणि कठोर परिश्रमाची जोड होती. शेवटी २०२० मध्ये दुसऱ्या प्रयत्नात त्यांना १७० वी रँक मिळाली आणि त्यांचे आयुष्यच बदलून गेले ते IPS अधिकारी बनले!

सर्वात महत्त्वाचं म्हणजे ज्या पोलीस खात्यात त्यांनी कॉन्स्टेबलसाठी अर्ज केला होता आणि अपयश मिळालं होतं, त्याच विभागात आता ते एका वरिष्ठ IPS अधिकाऱ्याच्या भूमिकेत परतले आहेत. सहावर्षात त्यांनी एकूण १२ सरकारी नोकऱ्या मिळवल्या आणि प्रत्येकवेळी ते अधिक चांगल्या संधीकडे वाटचाल करत गेले.

हे यश एका निर्धारलेल्या तरुणाचे आहे, ज्याने गरिबी, अपयश, आणि सामाजिक अडथळे यांच्यावर मात करत स्वप्न साकार केलं. आज प्रेमसुख डेलू संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांसाठी आणि तरुणांसाठी एक आदर्श ठरले आहेत. त्यांची कथा सांगते. अडचणी येतातच, पण खऱ्या योद्ध्याला थांबवू शकत नाहीत!

# दिल्ली विकास प्राधिकरण मध्ये भरतीला सुरुवात

**नौकरी एक्सप्रेस**

**दिल्ली/ प्रतिनिधी/** दिल्ली विकास प्राधिकरण मार्फत २०२५ मध्ये विविध पदांसाठी मोठ्या प्रमाणावर भरती जाहीर करण्यात आली आहे. सरकारी नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. भरती प्रक्रिया २७ मे २०२५ पासून सुरू झाली असून इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी ऊऊ- च्या अधिकृत वेबसाइट ववर.सीं.ळप वर जाऊन आपला अर्ज सादर करावा.

या भरतीत डिप्टी डायरेक्टर (आर्किटेक्ट, पब्लिक रिलेशन, प्लॅनिंग), असिस्टंट डायरेक्टर (प्लॅनिंग, आर्किटेक्चर, सिस्टिम, मिनिस्ट्रियल), AEE (सिव्हिल, इलेक्ट्रिकल), लीगल असिस्टंट, प्लॅनिंग असिस्टंट, आर्किटेक्चर असिस्टंट, असिस्टंट सेक्शन ऑफिसर, प्रोग्रामर, जूनियर इंजिनिअर (सिव्हिल आणि इलेक्ट्रिकल/मेकॅनिकल), स्टेनोग्राफर ग्रेड डी, नायब तहसीलदार, पटवारी, माळी, असिस्टंट सिक्योरिटी ऑफिसर, एमटीएस (मल्टी टास्किंग स्टाफ) यासह अनेक पदांचा समावेश आहे.




या भरतीमध्ये एकूण १३७९ पदांसाठी नियुक्ती होणार असून सर्वाधिक जागा MTS (७४५ पदे) आणि जूनियर इंजिनिअर (१०४ पदे) या विभागात आहेत. विविध पदांसाठी पात्रता वेगवेगळी असून काही पदांसाठी १० वी पास, ITI किंवा डिप्लोमा आवश्यक आहे, तर काही पदांसाठी अभियांत्रिकी, पदवी किंवा पदव्युत्तर पदवी असणे गरजेचे आहे. त्यामुळे विविध शैक्षणिक पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांसाठी ही भरती उपयुक्त ठरते. अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय १९ ते ३५ वर्षांच्या दरम्यान असावे.

उमेदवारांची निवड प्रक्रिया कंप्युटर आधारित चाचणी (CBT), कौशल्य चाचणी, कागदपत्र पडताळणी आणि मुलाखतीच्या माध्यमातून पार पाडली जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना सातव्या वेतन आयोगानुसार पे लेव्हल ६ नुसार ३५,४०० ते १,१२,४०० पर्यंत मासिक वेतन दिले जाईल. याशिवाय HRA, DA, TA यांसारखे विविध भत्तेही दिले जातील.

अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी DDA च्या अधिकृत वेबसाइटवर जाऊन 'ऑनलाइन अर्ज' लिंकवर क्लिक करून आपली नोंदणी करावी, लॉगिन करून अर्ज फॉर्म भरावा आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करून अर्ज शुल्क भरावे. अर्ज सादर केल्यानंतर त्याचा प्रिंटआउट सुरक्षित ठेवावा. ही संधी गमावू नका आणि आजच अर्ज प्रक्रिया पूर्ण करा.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती. ३०० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला. अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही... पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# आता कॅनडात नोकरी मिळणं कठीण, पण का?

कॅनडामध्ये लवकरच निवडणुका पार पडणार आहेत. निवडणुका जवळ आल्यामुळे आता ट्रूडो सरकार आता एकापेक्षा एक मोठ्या घोषणा करत असल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. ट्रूडो यांच्या निर्णयाचा परिणाम थेट भारतीयांवर होणार आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी तात्पुरत्या परदेशी कामगारांच्या संख्येला आळा घालण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. मात्र, या निर्णयाला आगामी निवडणुकीशीही जोडलं जात आहे. आपल्या १० वर्षांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या वर्षात, त्यांनी कमी पगाराच्या, कंत्राटी परदेशी कामगारांची संख्या कमी करण्याची योजना जाहीर केली आहे.

कॅनडाचे (उरपरवर) पंतप्रधान जस्टिन ट्रूडो (Canada PM² Justin Trudeau) यांनी निवडणुका जवळ आल्यानं एकापाठोपाठ एक अशा अनेक मोठ्या निर्णयांचा धडाका सुरू केला आहे.

त्यापैकीच एक निर्णय म्हणजे, कॅनडामध्ये कंत्राटी नोकऱ्या करणाऱ्या परदेशींची संख्या कमी करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे कमी पगारावर काम करणाऱ्या आणि देशात कंत्राटी नोकऱ्या करणाऱ्या लाखो परदेशी लोकांवर परिणाम होईल, ज्यामध्ये भारतीयांची संख्या मोठी आहे. कॅनडामध्ये शिकण्यासाठी जाणारे भारतीय विद्यार्थी महागाईमुळे अभ्यासाच्या बाहेर छोट्या नोकऱ्याही करतात. जस्टिन ट्रूडो यांच्या या निर्णयामुळे स्थलांतरित आणि तरुणांमध्ये बेरोजगारी वाढेल, असं निवडणूक तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

ट्विटरवर पोस्ट करत ट्रुडोनं यांनी लिहिलं आहे की, श्रमिक बाजार बदलला आहे. आम्ही कॅनडामधील कमी वेतनावर असलेल्या कंत्राटी परदेशी कामगारांची संख्या कमी करणार आहोत. आता आमच्या व्यवसायांसाठी कॅनेडियन कामगार आणि तरुणांमध्ये गुंतवणूक करण्याची वेळ आली आहे.दरम्यान, ट्रुडो यांच्या या निर्णयाला तज्ज्ञांकडून राजकारणाशी जोडलं जात आहे. या निर्णयामुळे कॅनडाच्या पंतप्रधानांना टीकेला सामोरं जावं लागत आहे. मोठ्या संख्येनं लोक त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. अनेक कॅनेडियन ट्विटर युजर्सनी त्यांना आतापर्यंतचे सर्वात वाईट पंतप्रधान म्हणून देखील संबोधलं आहे.

**कोरोनानंतर करण्यात आलेली कर्मचाऱ्यांच्या संख्येत घट**

सीबीसी न्यूजच्या वृत्तानुसार, कोरोना महामारीनंतर कामगारांच्या मोठ्या तुटवड्यामुळे ट्रूडो सरकारनं निर्बंधांमध्ये दिलासा दिला होता. यानंतर, कमी पगार असलेल्या अस्थायी कर्मचाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. आता कॅनडा इमिग्रेशन व्यवस्थेतील बदलांची चर्चा करत आहे. कायमस्वरूपी रहिवाशांच्या संख्येत घट झाल्यामुळे या आठवड्यात कॅबिनेट स्ट्रीटमध्ये या विषयावर चर्चा होऊ शकते.

**कोणत्या क्षेत्रांतील कंत्राटी कामगारांच्या संख्येत घट होणार?**

सरकारच्या म्हणण्यानुसार, ज्या ठिकाणी बेरोजगारीचा दर सहा टक्के किंवा त्याहून अधिक आहे, अशा ठिकाणी कमी पगाराच्या परदेशी कामगारांना काम दिलं जाणार नाही. दरम्यान, कृषी, अन्न आणि मत्स्य प्रक्रिया आणि आरोग्य सेवा यांसारख्या अन्न सुरक्षा क्षेत्रांमध्ये परदेशी नागरिकांना अजूनही दिलासा आहे, कारण या क्षेत्रांत कामगारांची कमतरता आहे

## संक्षिप्त

### शुभ'मन पर्वास सुरुवात

भारतीय क्रिकेट संघ पुढील महिन्यात इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार आहे. २० जून पासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघ ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या दौऱ्यापूर्वी भारताचे आधारस्तंभ असलेले अनुभवी रविचंद्रन अश्विन, रोहित शर्मा आणि विराट कोहली या तिघांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारली. भारताचे आधारस्तंभ असलेल्या या त्रिमूर्तीने जवळपास दीड दशके भारतीय क्रिकेटची धुरा वाहिली त्यामुळे या तिघांच्या निवृत्तीनंतर पहिल्यांदाच भारतीय क्रिकेट संघ कसोटी मालिका खेळतोय ते ही इंग्लंड सारख्या बलाढ्य संघाविरुद्ध आणि ते ही त्यांच्याच देशात त्यामुळे या दौऱ्यात भारतीय संघात कोणते खेळाडू असतील ? संघाचा कर्णधार कोण असेल? अश्विन, रोहित आणि विराट या तिघांची जगा कोण भरून काढणार ? असे अनेक प्रश्न क्रिकेट चाहत्यांना पडले होते. या प्रश्नाचे उत्तर निवड समितीने नुकतेच दिले. निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी इंग्लंड दौऱ्यासाठी १८ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. हे करताना त्यांनी नव्या कर्णधाराचीही घोषणा केली. भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार म्हणून युवा फलंदाज शुभमन गिलची निवड केली. युवा शुभमन गिल हाच भारताच्या कसोटी संघाचा नवा कर्णधार असेल अशी अपेक्षा होती आणि ती खरी ठरली. मी माझ्या ' भारतीय कसोटी संघाचा संक्रमणकाळ' या लेखात तसे भाकीत वर्तवले होते ते खरे ठरले. शुभमन गिलच्या गळ्यात कर्णधारपदाची माळ टाकून निवड समितीने त्याच्यावर मोठा विश्वास टाकला आहे अर्थात या विश्वासाला तो पात्र ठरेल का ? याचे उत्तर आगामी काळात मिळेलच मात्र त्याच्यावर ही कामगिरी सोपवून निवड समितीने सकारात्मक पाऊल टाकले आहे हे मान्यच करावे लागेल. शुभमन गिल आता २५ वर्षाचा आहे. अवघ्या २५ व्या वर्षी कर्णधारपदाची माळ गाळ्यात पडलेला शुभमन गिल हा पहिला खेळाडू नाही या आधी पतौडी, सचिन तेंडुलकर आणि रवी शास्त्री यांनी २५ व्या वर्षी किंवा त्याआधीच कर्णधारपद भूषवले आहे. सचिनकडे तर अवघ्या २१ व्या वर्षीच ही जबाबदारी आली होती. शुभमन गिलने मागील सात वर्षात जी कामगिरी केली त्या आधारेच त्याला भारतीय संघाचे कर्णधारपद मिळाले आहे. मागील सात वर्षातील त्याची कामगिरी चांगलीच नाही तर अविश्वसनियन अशी आहे. या सात वर्षात त्याने फलंदाज म्हणून तर छाप पाडलीच आहे पण कर्णधार म्हणूनही त्याने स्वतःला सिद्ध केले आहे. २०१८ मध्ये त्याच्या नेतृत्वाखाली १९ वर्षाखालील भारतीय संघाने विश्वविजेतेपदाला गवसणी घातली होती. या संघाचे नेतृत्व ज्याप्रकारे केले होते ते पाहून तेंव्हाच काही जाणकारांनी तो भविष्यात भारताच्या मुख्य संघाचा कर्णधार असेल असे भाकीत केले होते. ते भाकीत आज खरे ठरले. केवळ १९ वर्षाखालील संघाचीच नव्हे तर आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स या संघाचे नेतृत्व केले ते पाहता तो भारतीय संघाचे नेतृत्व करण्यास पात्र असल्याचे सिद्ध झाले. सध्या चालू असलेल्या आयपीएलमध्ये त्याने त्याच्या कुशल नेतृत्वाने गुजरात संघाला प्ले ऑफ मध्ये प्रवेश मिळवून दिला. या दरम्यान त्याने फलंदाजीतही चमक दाखवत ६०० च्या वर धावा काढल्या. याच कामगिरीच्या जोरावर त्याला भारतीय कसोटी संघाचे कर्णधारपद मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आता २० जूनला तो पहिल्यांदा भारतीय संघाचा कर्णधार म्हणून मैदानात उतरेल त्या क्षणापासून भारतीय क्रिकेटमध्ये! ' शुभ' मन पर्व सुरू होईल. शुभमन गिलची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड झाली असली तरी त्याच्यासाठी हे पद सांभाळणे सोपे नाही. भारतीय संघाचा कर्णधारपदाचा मुकुट हा काटेरी असतो. तो मुकुट धारण करणे म्हणजे साक्षात निखाऱ्यावरून चालण्यासारखे आहे त्यात शुभमन गिलला जो संघ दिला आहे तो नवखा आहे. या संघात अनेक नव्या खेळाडूंचा समावेश आहे. यातील बहुतेक खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव नाही. बुमरा, पंत आणि के एल राहुल याच खेळाडूंना इंग्लंडमध्ये खेळण्याचा अनुभव आहे त्यामुळे या नव्या खेळाडूंना घेऊन इंग्लंड सारख्या खडतर दौऱ्यावर जाऊन तिथे जिंकणे हे मोठ्या जिकिरीचे काम शुभमनला करावे लागणार आहे. अर्थात या संघाकडे गमावण्यासारखे काही नाही मात्र कमावण्यासाठी खूप काही आहे. शुभमन गिलने जर या नवख्या खेळाडूंकडून त्यांच्यातील सर्वोत्तम खेळ करून घेतला आणि आपल्या कुशल नेतृत्वाने भारतीय संघाला विजय मिळवून दिला तर मोठा इतिहास घडेल. अर्थात इतिहास घडवण्याची क्षमता या संघात आणि नव्या कर्णधारात आहे यात शंका नाही. भारतीय संघास आणि भारतीय संघाचा नवा कर्णधार असलेल्या शुभमन गिल यांस खूप खूप शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती- एका आदर्श महिला नेतृत्वाला वंदन!

भारतीय इतिहासात मोठी युद्धे झाली, साम्राज्ये उभी राहिली आणि कोसळली. परंतु, या साऱ्या घडामोडींमध्ये ज्या व्यक्तींनी आपल्या कार्याने समाजहित, धर्मरक्षण आणि जनकल्याण या मूल्यांना सर्वोच्च मान दिला, त्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्थान अग्रभागी आहे. त्यांच्या जीवनकार्याने सिद्ध केलं की एका स्त्रीचं नेतृत्व केवळ राजसिंहासनापुरतं मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचू शकतं. अहिल्याबाई होळकर या केवळ इंदूरच्या होळकर घराण्याच्या महाराणी नव्हत्या तर त्या एक द्रष्ट्या प्रशासक, न्यायप्रिय नेत्या, धर्मपरायण समाजसुधारक आणि स्त्री सक्षमीकरणाच्या आद्य पुरस्कर्त्या होत्या. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त, त्यांचे स्मरण त्यांच्या विचारांमधून नव्याने प्रेरणा घेण्याचे निमित्त आहे!

**प्रशासन आणि सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर**

अहिल्याबाईंचे नेतृत्व केवळ राज्यकारभारापुरते मर्यादित नव्हते, तर त्यात धर्म, न्याय, लोकसेवा आणि नीतीमूल्यांचे सखोल अधिष्ठान होते. त्यांनी महेश्वरला आपली राजधानी बनवली. ही राजधानी एक आदर्श प्रशासनाचे प्रमाण होते. येथे अहिल्याबाईंनी एक पारदर्शक, न्यायपूर्ण आणि लोकाभिमुख राज्यकारभार चालवला. तेव्हाच्या काळात एकराज्यकर्त्या महाराणी प्रत्यक्षपणे जनतेच्या तक्रारी ऐकून त्यावर तत्काळ निर्णय घेते, अशी कल्पनाही करवत नाही. पण अहिल्याबाई दररोज प्रजेसोबत संवाद साधत, त्यांच्या अडचणी समजून घेत आणि न्याय देत. हे त्यांचे कार्य आजच्या लोकशाही व्यवस्थेलाही मार्गदर्शक ठरावे असेच आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य धार्मिक स्थळांचे पुनरुज्जीवन आणि समाजकल्याण यासाठी वाहिले.

काशी विश्वनाथ, गंगाघाट, रामेश्वरम, सोमनाथ, द्वारका अशा अनेक प्राचीन आणि पवित्र स्थळांचे जीर्णोद्धार करून त्यांनी भारतीय सांस्कृतिक एकात्मतेचे धागे पुन्हा मजबूत केले. याशिवाय देशभर त्यांनी शेकडो धर्मशाळा, घाट, कुंड, विहिरी, अन्नछत्रे आणि विश्रामगृहे उभारली. हे कार्य कोणत्याही जाती-धर्माचा भेद न करता सर्वसामान्य जनतेसाठी केले गेले. त्यांच्या या पुढाकारामुळे हजारो लोकांना निवारा, अन्न आणि आधार मिळाला.त्यांचे हे सामाजिक कार्य आजही संपूर्ण भारतात लोककल्याणकारी राज्यशासनाचा आदर्श नमुना मानले जाते. प्रशासन आणि समाजकारण यांचा असा सुरेख मिलाफ क्वचितच इतिहासात पाहायला मिळतो-आणि त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर!

**पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर - स्त्री सक्षमीकरणाचे आदर्श!**




अठराव्या शतकातील भारतात स्त्रियांना घराच्या चार भिंतींपलीकडे जाण्याची मुभा नव्हती. पण अशा काळातही अहिल्याबाई यांनी स्त्रिया आत्मनिर्भर बनाव्या यासाठी पुढाकार घेतला. त्या काळात त्यांनी सुरू केलेला महेश्वरी साडी उद्योग केवळ व्यवसाय नव्हता तर तो एक सामाजिक क्रांतीचा भाग होता. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी काशी आणि इतर ठिकाणांहून कुशल विणकरांना महेश्वरला बोलावले. त्यांनी स्थानिक महिलांना हातमाग प्रशिक्षण दिले, आणि महिलांना घरोघरी बसून उत्पन्न मिळवण्याची संधी निर्माण केली. या उद्योगाने हजारो महिलांना केवळ रोजगारचं दिला नाही, तर स्वाभिमान, ओळख आणि आत्मसन्मानही दिला. आजही महेश्वर व आसपासच्या भागात महेश्वरी साड्या विणणाऱ्या हजारो महिला आपल्याला पहायला मिळतात. या साड्या केवळ पारंपरिक पोशाख नाहीत, तर त्या अहिल्याबाईंच्या द्रष्ट्या धोरणांचा आणि स्त्रीसन्मानाच्या तत्त्वांचा वस्त्ररूप अविष्कार आहेत. त्यांनी कोणत्याही जाती, धर्म, वर्ग यांचा भेद न करता सर्वांसाठी कार्य केले. १३ ऑगस्ट १७९५ रोजी या महान राणीने देहत्याग केला. धर्मशाळा, भजनमंडळे, सार्वजनिक पाणवठे आणि शिक्षणाच्या सुविधा त्यांनी महिलांसाठी खुल्या केल्या. त्या काळात जेव्हा स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते, तेव्हा त्यांनी महिलांना धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक निर्णयांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची मुभा दिली. अहिल्याबाईंच्या या कार्यामुळेच त्यांना 'पुण्यश्लोक, 'लोकमाता' आणि 'राजमाता' अशा सन्मानार्थ उपाधी प्राप्त झाल्या. भारत सरकारने त्यांच्या स्मृतींना वंदन म्हणून टपाल तिकीट प्रकाशित करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला आहे. इ.स. १७६७ साली त्यांनी महेश्वर येथे हातमाग उद्योग सुरू करून एक स्थायिक, गुणवत्ताधिष्ठित आणि बाजारपेठेचा विचार करणारा स्थानिक उद्योग उभारला. यामागील हेतू होता तो स्त्रियांना उपजीविकेचा मार्ग उपलब्ध करून देणे आणि महेश्वरला धार्मिक व पारंपरिक वस्त्रकलेचे केंद्र बनवणे. महेश्वरी साडी आणि अहिल्याबाई यांचे नाते केवळ वस्त्रनिर्मितीपुरते मर्यादित नाही, तर ते महिला सक्षमीकरण, सांस्कृतिक वारसा आणि स्थानिक उद्योगाचा उत्कर्ष यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

महेश्वरी साड्यांची क्रेझ आजही कायम !

- महेश्वरी साड्या हलक्या आणि देखण्या
-सूती किंवा सिल्क-कॉटन मिश्र धाग्यांपासून तयार होतात, त्यामुळे साडी नेसण्यास हलकी
-साड्यांची किनारी (पट्टा) (झरी पट्टा) अतिशय आकर्षक आणि पारंपरिक नक्षीकामाने सजलेली
-रिव्हर्सिबल बॉर्डर म्हणजेच दोन्ही बाजूंनी वापरता येणारी साडी ही वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट
-भारतातच नाही तर विदेशात ही प्रसिद्ध
-हस्तकला आणि महिला उपयोजनता याचे प्रतीक
-पारंपारिक पण मोहक रंगसंगती गडद जांभळा, हिरवा, पिवळा, राखाडी यांसारखे रंग

अहिल्याबाईंनी त्याकाळी फक्त उद्योग उभारला नाही, तर महिलांना कामात समाविष्ट करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनवले. आजही महेश्वर येथील अनेक महिलांचे कुटुंब महेश्वरी साड्या विणण्यावर अवलंबून आहेत. महेश्वरी साडी म्हणजे केवळ एक पारंपरिक वस्त्र नाही, तर ती आहे अहिल्याबाईंच्या दूरदृष्टीची, सामाजिक जाणिवेची आणि स्त्री सन्मानाच्या विचारांची एक जिवंत आठवण म्हणता येईल.

**अहिल्याबाईंची दूरदृष्टी - आजच्या 'स्टार्टअप' महिला उद्योजिकांसाठी प्रेरणास्रोत!**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची त्रिशतकी जन्मोत्सव साजरा करताना त्यांच्या दूरदृष्टीने घडवलेल्या उपक्रमांचा आजच्या काळातही प्रभाव दिसतो. महेश्वरी साडी उद्योग हे त्याचे अत्यंत प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी स्थापलेला हा स्थानिक उद्योग आजही महिला सक्षमीकरणाचा आदर्श मॉडेल मानला जातो. त्यांच्या विचारांतून निर्माण झालेल्या या व्यवसायाचे स्वरूप केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक समावेश, कौशल्यविकास आणि स्वावलंबनाच्या मूल्यांवर आधारित होते.आज अनेक स्वयंसेवी संस्था आणि शासनाच्या योजनांद्वारे महेश्वरी साडी उद्योगातून ग्रामीण महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला जात आहे. अहिल्याबाईंच्या कार्यातून मिळणारा मूलभूत धडा म्हणजे - कोणताही व्यवसाय फक्त नफा मिळवण्यासाठी नसावा, तर तो समाजातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याचे साधन असावे. त्यांची ही दूरदृष्टी आजच्या स्टार्टअप महिला उद्योजिकांसाठी मार्गदर्शक ठरते.

महिला उद्योजिकांनी सामाजिक संवेदना, स्थानिक कौशल्यांचा विकास आणि सांस्कृतिक मूल्यांचा समावेश करताना, व्यवसाय कसा दीर्घकालीन आणि समर्पित बनवावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्याबाईंचा साडी उद्योग.

आज महेश्वरी साडी जगभरात प्रसिद्ध आहे, पण तिच्या प्रत्येक धाग्यामागे पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे स्वप्न, दूरदृष्टी आणि स्त्रीच्या सन्मानासाठी दिलेले योगदान विणलेले आहे.

या ऐतिहासिक वारशाला आदरांजली वाहत, राज्य सरकारने ७ मे २०२५ रोजी अहिल्याबाईंच्या जन्मस्थळी - चौंडी (जि. अहमदनगर) - पार पडलेल्या विशेष मंत्रिमंडळ बैठकीत महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविण्याचा निर्णय घेतला. या अभियानाचा उद्देश म्हणजे महिलांना आरोग्य, पोषण, शिक्षण, आर्थिक सबलीकरण, सामाजिक सहभाग आणि नेतृत्व विकासाच्या माध्यमातून सशक्त करणे आहे. तसेच बालमृत्यू व मातामृत्यू कमी करणे, महिलांचा पंचायतराजमध्ये सहभाग वाढवणे, बालविवाह व कौटुंबिक हिंसाचारास प्रतिबंध करणे, अशा अनेक महत्त्वपूर्ण बाबी यामध्ये समाविष्ट आहेत.

ग्रामपातळीपासून राज्यस्तरापर्यंत विशेष समित्या स्थापन करून त्यांचे वार्षिक मूल्यमापन केले जाईल. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समित्यांना आदिशक्ती पुरस्कार देण्यात येणार असून, हे पुरस्कार दरवर्षी मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वितरित होतील. या उपक्रमासाठी दरवर्षी अंदाजे १०.५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

या अभियानाचे मूळ बीज पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या विचारांमध्येच आहे - स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नसून, ती समाजाच्या पुनर्बांधणीची शक्ती आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राबवले जाणारे 'आदिशक्ती अभियान' हे स्त्रीसन्मान, स्त्रीसशक्तीकरण आणि सामाजिक परिवर्तनाचे आधुनिक रूप आहे.

**- वर्षा फडके-आंधळे,**
**उपसंचालक (वृत्त)**

# DRDO मध्ये विविध पदांसाठी भरती

सरकारी नोकरीची (Govt Job) तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी मोठी आणि महत्वाची बातमी समोर आली आहे.

सरकारी नोकरीची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी मोठी आणि महत्वाची बातमी समोर आली आहे. जर तुम्हाला विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशाच्या संरक्षणात योगदान द्यायचे असेल तर तुमच्यासाठी ही आनंदाची बातमी आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (DRDO) ने २०२५ साठी वैज्ञानिक पदांसाठी भरती जाहीर केली आहे. जाणून घेऊयात सविस्तर माहिती.

मिळालेल्या माहितीनुसार, ही संधी विशेषतः अशा तरुणांसाठी आहे की, ज्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले आहे. देशासाठी काहीतरी मोठे करु इच्छितात त्यांच्यासाठी ही संधी आहे. इच्छुक उमेदवार डीआरडीओच्या अधिकृत वेबसाइट rac.gov.in ला भेट देऊन ऑनलाइन अर्ज करु शकतात. या भरतीची अधिसूचना जूनच्या पहिल्या आठवड्यात रोजगार वृत्तात प्रकाशित होण्याची शक्यता आहे. अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांपर्यंत अर्ज करता येतील. या भरती मोहिमेअंतर्गत एकूण १४८ शास्त्रज्ञांची पदे भरली जातील, ज्यामध्ये डीआरडीओ, एडीए आणि राखीव श्रेणींसाठीची पदे समाविष्ट आहेत.

**काय आहे पात्रता?**

इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन, मेकॅनिकल, संगणक विज्ञान किंवा इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीमध्ये प्रथम श्रेणीची पदवी असलेले उमेदवारच भरतीसाठी पात्र मानले जातील. याशिवाय, त्यांच्याकडे ऋ-ढए परीक्षेचा वैध गुण देखील असणे आवश्यक आहे. सामान्य आणि ईडब्ल्यूएस श्रेणीतील उमेदवारांचे कमाल वय ३५ वर्षे ठेवण्यात आले आहे. ही मर्यादा ओबीसी (नॉन क्रिमी लेयर) प्रवर्गासाठी ३८ वर्षे आणि अनुसूचित जाती/जमातीसाठी ४० वर्षे निश्चित करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातील सहा मान्यवर पद्म पुरस्काराने सन्मानित

**नौकरी एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/ प्रतिनिधी/** विविध क्षेत्रांमध्ये अतुलनीय काम करणा-या ६८ मान्यवरांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असणाऱ्या 'पद्म पुरस्कारां' ने सन्मानित करण्यात आले. यात महाराष्ट्रातील सहा मान्यवरांचा समावेश आहे.राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपती यांच्या हस्ते दुस-या व अंतिम टप्यात पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, तसेच अन्य केंद्रीय मंत्रीगण व केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.या पुरस्कार समारंभात राज्यातील सहा मान्यवरांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री व माजी लोकसभा अध्यक्ष डॉ .मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मभूषण पुरस्कार' (मरणोत्तर) तर अशोक सराफ, अच्युत पालव , अश्विनी भिडे-देशपांडे यांना कला क्षेत्रातील अमूल्य योगदानासाठी तसेच कृषी क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा व वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्काराने राष्ट्रपती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**डॉ. मनोहर जोशी यांना पद्मभूषण (मरणोत्तर) पुरस्कार प्रदान**

राज्याचे माजी मुख्यमंत्री तसेच माजी लोकसभा अध्यक्ष डॉ. मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रात अमूल्य योगदानासाठी 'पद्मभूषण' (मरणोत्तर) पुरस्कारने गौरविण्यात आले. हा पुरस्कार त्यांचे सुपुत्र श्री. उन्मेश जोशी यांनी स्विकारला. डॉ. जोशी यांनी पाच दशकाच्या राजकीय कारकिर्दीत मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक, महापौर, आमदार, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि लोकसभा अध्यक्ष या सर्व जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्या. सन १९९५ मध्ये ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर २००२ ते २००४ या कालखंडात त्यांनी लोकसभा अध्यक्षपद भूषवले. रायगड जिल्ह्यातील नांदवी या गावी जन्मलेल्या जोशी यांनी शिक्षण, शिस्त, आणि कार्यक्षम नेतृत्वाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती.

पाच मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार प्रदान

**: अशोक सराफ :**

मराठी चित्रपटसृष्टीतील विनोदी अभिनयाचे सम्राट, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना त्यांच्या कला क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिनयातील सहजता, टायमिंग आणि विविध भावछटांचे सशक्त सादरीकरण या बाबींसाठी त्यांना हा सन्मान मिळाला. अशोक सराफ यांचे 'अशी ही बनवाबनवी', 'धुमधडाका', 'बाळाचे बाप ब्रम्हचारी' आणि 'पंढरीची वारी' यासारखे अनेक चित्रपट रसिकांच्या हृदयात कायमचे घर करून आहेत.अशोक सराफ यांच्या अभिनयाचे विशेष कौतुक दिग्गज अभिनेता दिलीप कुमार यांनी देखील केले होते. एका नाटकाच्या प्रयोगादरम्यान दिलीप कुमार यांनी सराफ यांना त्यांच्या अभिनयाच्या टायमिंगसाठी शाबासकी दिली होती. श्री. सराफ यांचा अभिनय जीवनभर अविस्मरणीय ठरला आहे. 'अशी ही बनवाबनवी' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अपार यश मिळवले असून, तो आजही मराठी रसिकांचा आवडता चित्रपट आहे. केवळ मराठीच नव्हे तर हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन मालिकांमध्येदेखील अशोक सराफ यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे.

**: अच्युत पालव :**

देवनागरी लिपीच्या कलेला नवसंजीवनी देणारे प्रसिद्ध कॅलिग्राफर अच्युत पालव यांना कला क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सर्जनशीलतेतून देवनागरी लिपीचे सौंदर्य आणि शिस्तबद्धता प्रभावीपणे समोर येते.अच्युत पालव यांची कला शैली ही पारंपरिकतेचा गाभा राखत आधुनिकतेशी सुसंगत अशी असून, ते अक्षरांना विशिष्ट आकार, संतुलन आणि



कलात्मक स्पर्श देतात. त्यांच्या लेखनातून केवळ पठनीयता जपली जात नाही, तर सौंदर्यदृष्ट्याही ते अक्षरांना एक नवे आयाम मिळवून देतात. ते फक्त भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही देवनागरी लिपीचा प्रचार व प्रसार करतात. त्यांनी विविध देशांमध्ये कार्यशाळा, प्रदर्शने आणि सेमिनार्सद्वारे देवनागरी लिपीची कला आणि तिची वैशिष्ट्ये प्रभावीपणे मांडली आहेत. यासोबत, त्यांच्या प्रकाशित पुस्तकांमुळे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यांमुळे नागरी लिपीला एक स्वतंत्र कला म्हणून प्रतिष्ठा लाभली आहे.

**: अश्विनी भिडे-देशपांडे :**

जयपुर-अतत्रौली घराण्याच्या ख्याल गायकी परंपरेतील आघाडीच्या गायिका अश्विनी भिडे-देशपांडे यांना शास्त्रीय संगीत क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बालपणापासून संगीताची गोडी असलेल्या अश्विनी यांनी गांधर्व महाविद्यालयातून संगीत विशारद पदवी प्राप्त केली. पं. नारायणराव दातार आणि आई माणिक भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी जयपूर घराण्याची सखोल साधना केली.त्यांच्या गायकीत रागांची सौंदर्यपूर्ण मांडणी, भावाभिव्यक्ती आणि लयकारी यांचे अद्वितीय समन्वय आढळतो. त्यांनी शास्त्रीय गायनाबरोबर ठुमरी, भजन, अभंग यातही निपुणता साधली आहे. एचएमवीसह अनेक नामवंत संगीत कंपन्यांमार्फत त्यांचे अल्बम प्रकाशित झाले आहेत. राष्ट्रीय कालिदास सन्मान(२०१६), संगीत नाटक अकादमी पुरस्कार(२०१५), राष्ट्रीय कुमार गंधर्व सन्मान (२००५) यांसारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. आजही त्या आपल्या गायन, अध्यापन व कार्यशाळांद्वारे ख्याल गायकीची परंपरा समृद्ध करत आहेत.

**: सुभाष शर्मा :**

यवतमाळ जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकरी सुभाष शर्मा यांना कृषी क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात आले. नैसर्गिक शेतीच्या विविध पद्धतींचा अवलंब करून त्यांनी हजारो शेतकऱ्यांना प्रेरणा आणि मार्गदर्शन देत आहेत. सुभाष शर्मा यांचे वडील खेतूलाल यांच्या १६ एकर शेतीची जबाबदारी त्यांच्या निधनानंतर त्यांच्यावर आली. मात्र, २०११ मध्ये त्यांनी वडिलोपार्जित शेती विकून तिवसा शिवारात त्यांनी १६ एकर जमीन खरेदी केली. नव्या जमिनीवर त्यांनी नैसर्गिक शेतीचे प्रयोग सुरू केले. मातीची सुपीकता राखण्याचे तंत्र, पिकांचे नियोजन आणि पर्यावरणपूरक पद्धती यामुळे त्यांची शेती देशभरातील शेतकऱ्यांसाठी आदर्श ठरली. सततच्या प्रयोगशीलतेने आणि जिद्दीने त्यांनी शेतीत नवदृष्टी निर्माण केली. त्यांचा संघर्ष, नवनिर्मितीचा दृष्टिकोन आणि कृषी क्षेत्रातील योगदानाची दखल घेत त्यांना पद्मश्री या देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले आहे.


**: डॉ. विलास डांगरे :**

७० वर्षीय डॉ. विलास डांगरे यांना वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. होमिओपॅथीच्या माध्यमातून त्यांनी गरजूंच्या आरोग्यसेवेत अतुलनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नाडी परीक्षण कौशल्यामुळे ते एक सुप्रसिद्ध होमिओपॅथी चिकित्सक म्हणून ओळखले जातात. खास करून २०१४ मध्ये नागपूरच्या कस्तूरचंद पार्कमध्ये झालेल्या रॅलीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घश्याला त्रास झाला होता, तेव्हा डॉ. डांगरे यांनी केलेल्या उपचारामुळे त्यांना आराम पडला होता. नागपूरमधील त्यांचे क्लिनिक गरजू रुग्णांसाठी आश्रयस्थान ठरले असून त्यांनी आतापर्यंत एक लाखाहून अधिक रुग्णांना उपचार दिले आहेत. १० वर्षा पासून ते दिव्यांग-दृष्टीहीन झाले आहेत. तथापि, त्यावरही मात करत ते आपली अमूल्य सेवा रुग्णांना देत आहेत.यंदाच्या पद्म पुरस्कार वितरणाची प्रक्रिया दोन टप्प्यात झाली. पहिल्या टप्पयात ७१ जणांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले, यामध्ये मध्ये ४ पद्मविभूषण, १० पद्मभूषण आणि ५७ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. आज उर्वरित ६८ पद्म पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यामध्ये ३ पद्मविभूषण, ०९ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे यंदाच्या पुरस्कार यादीत एकूण १३९ मान्यवरांची निवड करण्यात आली होती. त्यात ७ पद्मविभूषण, १९ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे.

## KGMU नर्सिंग ऑफिसर ७३३ पदांसाठी भरती

किंग जॉर्ज मेडिकल युनिव्हर्सिटी, लखनऊने ७३३ नर्सिंग ऑफिसर पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुक उमेदवार २५ एप्रिल २०२५ पासून अधिकृत वेबसाइटवर अर्ज करू शकतात.

लखनऊमधील किंग जॉर्ज मेडिकल युनिव्हर्सिटी (KGMU) ने २०२५ साठी नर्सिंग ऑफिसर म्हणजेच सिस्टर ग्रेड-II पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. ही भरती नर्सिंग क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांसाठी एक मोठी संधी आहे. अर्ज प्रक्रिया २५ एप्रिल २०२५ पासून सुरू झाली असून, इच्छुक आणि पात्र उमेदवार अधिकृत वेबसाइट www.kgmu.org वर जाऊन ऑनलाईन अर्ज करू शकतात.




या भरतीद्वारे एकूण ७३३ पदे भरली जाणार असून त्यामध्ये १०७ पदे बॅकलॉग अंतर्गत आणि ६२६ पदे सामान्य भरती अंतर्गत आहेत. या पदांसाठी उमेदवारांची निवड संगणक आधारित लेखी परीक्षेद्वारे (CRT) केली जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना सातव्या वेतन आयोगानुसार ४४,९०० ते १,४२,४०० पर्यंतचा मासिक पगार मिळणार आहे. या पदांसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवारांकडे मान्यताप्राप्त संस्थेमधून इ.डल नर्सिंग किंवा पोस्ट बेसिक B.Sc नर्सिंग पदवी असणे आवश्यक आहे. याशिवाय, जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी (GNM²) डिप्लोमा असलेले उमेदवारही अर्ज करू शकतात, मात्र त्यांच्याकडे किमान ५० खाटांचे रुग्णालयात दोन वर्षांचा अनुभव असावा. उमेदवाराचे वय १ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ४० वर्षांदरम्यान असावे. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय व आर्थिक दुर्बल घटकांतील उमेदवारांना वयोमर्यादेत सवलत दिली जाईल.

अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी प्रथम घत्रह्वण च्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन "Nursing Officer Recruitment 2025' या लिंकवर क्लिक करावे. त्यानंतर नोंदणी करून लॉगिन माहिती प्राप्त करावी. फॉर्ममध्ये सर्व आवश्यक माहिती भरून आवश्यक कागदपत्रं अपलोड करावीत. नंतर संबंधित श्रेणीनुसार शुल्क भरावे. सर्वसाधारण, ओबीसी व ईडब्ल्यूएससाठी २,३६० तर अनुसूचित जाती-जमातीसाठी १,४१६ शुल्क आहे. त्यानंतर अर्ज सादर करून त्याची छायांकित प्रत सुरक्षित ठेवावी.

चयन प्रक्रियेअंतर्गत १०० बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा घेतली जाईल. परीक्षेसाठी २ तासांचा कालावधी दिला जाईल. यानंतर पात्र उमेदवारांची दस्तऐवज पडताळणी केली जाईल. ही भरती नर्सिंग क्षेत्रात स्थिर आणि प्रतिष्ठित नोकरी मिळवण्याची उत्तम संधी आहे.इच्छुक उमेदवारांनी सर्व आवश्यक कागदपत्रांसह लवकर अर्ज करून ही संधी साधावी.


## UPSC NDA आणि NA परीक्षा २०२५: अधिसूचना जाहीर

# अर्जासाठी अंतिम दिनांक कोणती?

युपीएससीने एनडीए आणि एनए (द्वितीय) २०२५ परीक्षेची अधिसूचना जाहीर केली असून अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. पात्र उमेदवार १७ जून २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करू शकतात; परीक्षा १४ सप्टेंबरला होणार आहे.

युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन (UPSC) ने राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) आणि नौदल प्रबोधिनी (NA) परीक्षा (द्वितीय), २०२५ साठी अधिसूचना जारी केली आहे. ही अधिसूचना २८ मे २०२५ रोजी "Examination Notice No. 10/2025-NDA-II' या क्रमांकाने प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही परीक्षा १५६ व्या NDA कोर्ससाठी आणि ११८ व्या इंडियन नेव्हल अकॅडमी (INAC) कोर्ससाठी आहे, जे १ जुलै २०२६ पासून सुरू होणार आहेत.

पात्र असलेले अविवाहित पुरुष आणि महिला उमेदवार १७ जून २०२५ पर्यंत नवीन युपीएससी पोर्टलवर (https://upsconline.nic.in) ऑनलाईन अर्ज करू शकतात. लेखी परीक्षा १४ सप्टेंबर २०२५ रोजी भारतभरातील विविध केंद्रांवर घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी २ जानेवारी २००७ ते १ जानेवारी २०१० दरम्यान जन्मलेले उमेदवार पात्र आहेत. उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंत लग्न न करण्याची हमी द्यावी लागते. जर प्रशिक्षणादरम्यान विवाह झाला, तर उमेदवारास त्वरित प्रशिक्षणातून वगळण्यात येईल व प्रशिक्षण खर्चाची



परतफेड करावी लागेल.

उमेदवारांची निवड UPSC कडून घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेद्वारे केली जाईल. त्यानंतर सेवा निवड मंडळाकडून (SSB) बौद्धिक व व्यक्तिमत्व मूल्यांकन चाचणी (SSB Interview) घेतली जाईल. अंतिम गुणवत्ता यादीसाठी दस्तऐवज तपासणी व वैद्यकीय चाचणी केली जाईल. उमेदवारांनी https://upsconline.nic.in या पोर्टलवर युनिक रजिस्ट्रेशन आणि कॉमन अर्ज फॉर्म वापरून ऑनलाईन अर्ज करावा. एकदा अर्ज सबमिट केल्यावर त्यात कोणताही बदल करता येणार नाही. आधार कार्ड ओळखपत्र म्हणून वापरण्याचा सल्ला दिला आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १७ जून २०२५ रात्री ११:५९ वाजेपर्यंत आहे. अर्ज शुल्क सर्वसाधारण व ओबीसी प्रवर्गासाठी १०० असून, अनुसूचित जाती/जमाती, महिला, तसेच JCOs/NCOs/ORs यांचे पाल्य यांच्यासाठी शुल्क माफ आहे.

NDA आर्मीमध्ये २०८ जागा (१२वी पास कोणत्याही शाखेतून), NDA नेव्हीमध्ये ४२ जागा (PCM²), NDA एअरफोर्स फ्लाइंग ९२ जागा (PCM²), ग्राउंड टेक्निकल१८ जागा (PCM²), ग्राउंड नॉन-टेक्निकल १० जागा (PCM²), तर नेव्हल अकॅडमीमध्ये ३६ जागा (१२वी पास झउच् सह) आहेत. ही सुवर्णसंधी आहे देशसेवेसाठी झपाटलेल्या युवक-युवतींसाठी. इच्छुकांनी वेळेत अर्ज करून तयारीला लागावे.

## SIP, FD सोडा, 'या' मार्गाने तुम्ही कमवू शकता करोडो रुपय

अलिकडच्या काळात गुंतवणुकीचे महत्व वाढत आहे. तसेच गुंतवणुकीचे विविध पर्याय देखील आहेत. दरम्यान, पैशांची गुंतवणूक करताना दोन गोष्टी महत्वाच्या असतात. एक म्हणजे गुंतवलेली रक्कम सुरक्षीत आहे का? आणि दुसरं म्हणजे त्या रकमेवर परतावा किती मिळतोय? या गोष्टी महत्वाच्या आहेत. गुंतवणुकीसाठी अनेकजण एसआयपी आणि एफडी देखील मार्ग निवडतात. परंतू, आज आपण अशा ४ बचत पर्यायांबद्दल माहिती पाहणार आहोत की, ज्याद्वारे तुम्ही कोट्यवधी रुपयांचा निधी तयार करु शकता. जाणून घेऊयात सविस्तर माहिती.

तुमच्या कमाईची गुंतवणूक करण्यासाठी बाजारात अनेक पर्याय उपलब्ध आहेत, ज्यामध्ये तुम्हाला गुंतवणुकीच्या रकमेवर निश्चित व्याज मिळते. लोक शेअर बाजारात गुंतवणूक करुनही पैसे कमवतात. लोक एसआयपीद्वारे म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करुन आणि एफडीमध्ये गुंतवणूक करूनही नफा कमावतात. पण आज आपण अशा गुंतवणूक पर्यायांबद्दल माहिती पाहणार आहोत की, ज्याद्वारे तुम्ही कोट्यवधी रुपये वाचवू शकता.शेअर बाजार धोकादायक असू शकतो. परंतू, दीर्घकाळात तो उत्तम परतावा देतो. मजबूत मूलभूत तत्त्वे असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करा आणि बाजारातील चढउतारांना घाबरु नका. नियमित गुंतवणूक आणि संयमाने, १५ ते २० टक्के वार्षिक परतावा शक्य आहे. रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करुन पैसे देखील कमवता येतात. जसे की जमीन किंवा व्यावसायिक मालमत्ता, दीर्घकाळात मोठा नफा देऊ शकते. वाढत्या शहरीकरणासह मालमत्तेच्या किमती वेगाने वाढत आहेत. लहान गुंतवणुकीपासून सुरुवात करुन, तुम्ही भाड्याने मिळणाऱ्या उत्पन्नातून किंवा मालमत्ता विक्रीतून कोट्यवधी कमवू शकता. लोक या क्षेत्रात लक्झरी मालमत्ता देखील खरेदी करत आहेत.

## 'छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत' पुरस्काराचे वितरण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते सम्पन्न



**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने राज्य शासनाकडून प्रथमच राज्य प्रेरणागीत पुरस्कार घोषित झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण 'वर्षा'' या शासकीय निवासस्थानी करण्यात आले.स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिखित 'अनादि मी.. अनंत मी' या गीतास प्राप्त झालेल्या राज्य शासनाच्या 'छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्कार - २०२५' सोहळ्याकरीता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, आमदार संजय उपाध्ये, सांस्कृतिक कार्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानचे रणजीत सावरकर, अशीलता राजे, स्वप्नील सावरकर, मंजिरी मराठे, अविनाश धर्माधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी केंद्रीय गृहमंत्री शाह आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी २ लाख रुपयांचा धनादेश स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला.

याप्रसंगी सांस्कृतिक कार्यमंत्री ड.शेलार म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन जगण्याची आणि मरण्याची दोन्हीची प्रेरणा देते. त्यासोबतच, प्रचंड बुद्धिमत्तेने संभाजी महाराजांनी स्वतः साहित्य निर्मितीचे कार्यही फार उत्तम केले. त्यांनी ग्रंथही लिहिले, कविताही लिहिल्या. म्हणूनच, त्यांच्या नावाने राज्याचा पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला. स्वाभाविकच स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे 'अनादि मी, अनंत मी..' प्रचंड आत्मबळ असलेले गीत त्यांनी लिहिले आणि रचले. त्यामुळेच राज्य शासनाने हा पुरस्कार दिला असल्याचे मंत्री ड.शेलार यांनी यावेळी सांगितले.

# पोलिस भरती येऊन गेलेले सराव पेपर

**प्र.१–भारतीय नौदलाच्या कमांडोना....असे नाव आहे.**
(१)कोब्रा (२)ब्लॅक कॅट (३)मार्कोस (४)ग्रे हाऊंड

**प्र.२–रेल्वे सुरक्षा अल कोणाच्या नियंत्रणात काम करते?**
(१)राज्य शाासन(२)गृह मंत्रालय (३)रेल्वे मंत्रालय(४)यापैकी नाही

**प्र.३–महाराष्ट्राच्या दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख....?**
(१)श्री प्रवीण दिक्षित (२)जयजीत सिंग
(३)श्रीमती मीरा बोरवणकर (४)देवेन भारती

**प्र.४–मे २०१५ मध्ये केंद्रीय निमलष्करी बल चे प्रमुख म्हणून कोणत्या भा.पो.से अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली?**
(१)सुरेंद्र कुमार (२)सुरेंद्र सिंग (३)सत्यपाल (४)प्रभु सिंग

**प्र.५–पुढे दिलेल्या कोणत्या राज्यात भारतीय लष्कराकडून ‘ऑरेशन गुडविल’ ही सदिच्छादर्शक मोहिम राबविली गेली होती?**
(१)आसाम (२)बिहार (३)मिझोराम (४)जम्मु–काश्मिर

**प्र.६–नक्षलवादाच्या सर्वात कमी प्रभाव असणारा महाराष्ट्रातील जिल्हा कोणता?**
(१)गडचिरोली (२)चंद्रपुर (३)गोंदिया (४)नाशिक

**प्र.७–CCTNS कशासंबंधी प्रणाली आहे?**
(१)बातम्या (२)क्रीडा (३)तांत्रिक (४)गुन्हे व गुन्हेगार

**प्र.८–भारतात प्रथमच आत्मसमर्पित नक्षलवाद्यांची नवजीवन नगर वसाहत कोठे उभारली जात आहे?**
(१)नागपूर (२)गडचिरोली (३)गोंदिया (४)चंद्रपूर

**प्र.९–‘पोलीस प्रश्नांवर तरुणांची संवाद–युथ पार्लमेंट’ ही संकल्पना कोणत्या पोलीस अधिकाऱ्याची आहे?**
(१)दत्तात्रय शिंदे (२)विश्ववास नांगरे पाटील
(३)महादेव तांबडे (४)रविंद्र सेनगावकर

**प्र.१०–‘पाोलीस आणि कायदा व सुव्यवस्था’ हे विषय घटनेच्या परिशिष्ट सातमधील.....मध्ये नमूद केले आहे?**
(१)राज्यसुची (२)केंद्रसूची (३)समवर्ती सूची (४)यापैकी नाही

**प्र.११–डॉ.पोळ आरोपी असलेली सिरीयल मर्डर केस कोणत्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेली आहे?**
(१)वाई (२)कोरेगाव (३) फलटण (४)म्हसवड

**प्र.१२–हिंगोली जिल्ह्यामध्ये किती पोलीस स्टेशन आहेत?**
(१)१५ (२)१७ (३)१२ (४)१३

**प्र.१३–याकुब मेमन या बॉम्ब स्फोटातील आरोपीस कोठे फाशी दिली गेली?**
(१)आर्थर रोड जेल (२)येरवडाजेल
(३)नागपूर जेल (४)तिहार जेल

**प्र.१४–कोणते पोलीस अधिकारी यांना वर्ष २०१५‘लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ दी ईयर’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले?**
(१)मनोज शर्मा (२)रोजेश प्रधान
(३)रविंद्र कदम (४)संदीप पाटील

**प्र.१५–नुकतेच संसदेने बाल गुन्हेगाराचे वय बाल न्याय विधेयक नुसारर.....इतके केले आहे?**
(१)१५ वर्ष (२)१६ वर्ष (३)१७ वर्ष (४)१८ वर्ष

**प्र.१६–नक्षलवादाचा गैरप्रभाव भारताच्या कोणत्या राज्यात नाही?**
(१)महाराष्ट्र (२)छत्तीसगड (३)झारखंड (४)उत्तराखंड

**प्र.१७–आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय कोठे आहे?**
(१)हेक (२)न्यूयॉर्क (३)टोकियो (४)नवी दिल्ली

**प्र.१८–नक्षलवाद्यांच्या मुळ छोट्या गटास काय म्हणतात?**
(१)दलम (२)प्लाटुन (३)टिम (४)स्वाध्याय

**प्र.१९–निक्षलवाद्यांनी नुकत्याच पोलीस केंद्रावर कोठल्या ठिकाणी ॲम्बुश/हल्ला केला?**
(१)टिपागड (२)जाराबंडी (३)लालगड (४)दांतेवाडा

**प्र.२०–अतिरेक्यांशी लढा देण्यासाठी २६/११ नंतर महाराष्ट्र राज्यात कोणत्या विशेष दलाची स्थापना करण्यात आली?**
(१)एन.एस.जी (२)फोर्स वन (३)ग्रे हाऊंड (४)मार्कोस

**प्र.२१–गडचिरोली पोलीस दल व भुमकाल संघटनेव्दारा, लोक सहभागातुन....नाल्यावर पुल इ.स.२०१६ मध्ये बांधण्यात आला.**
(१)किष्टपुर (२)ताडगुडा (३)येरमनार (४)जुवी

**प्र.२२–गडचिरोलीमध्ये हे पोलीस मदत केंद्र २०१७ मध्ये कार्यान्वित झाले.**
(१)पातागुहाम (२)कटेझरी (३)कौटमी (४)खेलकचिल

**प्र.२३–नक्षलबारी घटनेला यावर्षी....वर्ष पूर्ण होत आहेत.**
(१)२५ (२)३० (३)५० (४)६०

**प्र.२४–महीराष्ट्रात (भारतीय रिझर्व्ह बटालियन)क्रमांक १४ कोठे आहे?**
(१)गोंदिया (२)धुळे (३)कोल्हापुर (४)औरंगाबाद

**प्र.२५–‘ग्र हाऊंडस’ हे नक्षलवाद विरोधी पोलीस दल कोणत्या राज्याने उभारले आहे?**
(१)कर्नाटक,गोवा (२)महाराष्ट्र,मध्ये प्रदेश
(३)आध्र प्रदेश (४)झारखंड,पश्चिम बंगाल

**प्र.२६–इस्त्राईलच्या गुप्तहेर संस्थेचे नाव काय आहे?**
(१)एमआयए (२)सिआयए (३)मोसाद (४)रॉ

**प्र.२७–मुंबईचे पोलीस आायुक्त जावेद अहमद यांची कोणत्या देशात भारताचे राजदूत म्हणून नियक्ती करण्यात आली?**
(१)मलेशिया (२)सिंगापूर (३)रशिया (४)सौदी अरेबिर्यो

**प्र.२८–सदोष मनुष्याचे भारतीय दंडविधान संहिता मधील योग्य कलम कोणते?**
(१)३०४ अ (२)३०४ (३)३०६ (४)३०१

**प्र.२९–पुणे पोलीसांच्या बडी कॉप हा उपक्रम कोणाकरिता राबविला जात आहे?**
(१)ज्येष्ठ नागरिक (२)नोकरपेशा महिला
(३)बाल गुन्हेगार (४)शालेय विद्यार्थी

**प्र.३०–माहिती अधिकार कायदा कधी अस्तित्वात आला?**
(१)२००५ (२)२००६ (३)२००७ (४)२००४

**प्र.३१–१९८८ कायदा लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील व्याख्येप्रमाणे लाच म्हणजे काय?**
(१)पैसे घेणे (२)मौल्यवान वस्तू घेणे
(३)सदर कायद्यात ती व्याख्या नाही (४)अ व ब दोन्ही

**प्र.३२–अ या लोकसेवकाने ब या व्यक्तीकडून शासकीय काम करण्यासाठी मौल्यवान वस्तुंची मागणी केली त्याने लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कोणत्या कलमान्वये गुन्हा केला?**
(१)६ (२)७ (३)८ (४)९

**प्र.३३–माहिती अधिकार कायदा २००५अन्वये एखाद्याच्या जिवितास करणीभूत असणारी माहिती किती कालावधीमध्ये देणे बंधनकारक आहे?**
(१)४८तास (२)२४तास (३)५दिवस (४)३दिवस

**प्र.३४–गुन्हेगारांचे डीएनए आधारित माहितीचे संकलन करून त्यांचे प्रो आईल तयार करणारे खालीलपैकी कोणते राज्य देशातील पहिले राज्य ठरले?**
(१)केरळ (२)आंध्र प्रदेश (३)महाराष्ट्र (४)गुजरात

**प्र.३५–प्रशासनात अधिक पारदर्शकता आणणे तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या उद्देशाने भारतात......या वर्षीपासुन माहितीचा अधिकार देण्यात आला आहे?**
(१)२००१ (२)२००२ (३)२००४ (४)२००५

**प्र.३६–भारताच्या पहिल्या स्वदेशी लढाऊ विमानाचे नाव काय आहे?**
(१)चेतक (२)पृथ्वी (३)तेजस (४)ब्राम्होस

**प्र.३७–पोलीस पाटील म्हणून नेमणूक होण्यासाठी उमेदवार किमान.....उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.**
(१)दहावी (२)बारावी (३)आठवी (४)अकरावी

**प्र.३८–भारतामध्ये गृहखात्याची निर्मिती केव्हा करण्यात आली?**
(१)१८५० (२)१८५८ (३)१८९५ (४)१८४३

**प्र.३९–जून २०१५ मध्ये हवाई हल्ल्यापासून संरक्षण करणारी खालीलपैकी कोणती यंत्रणा भारतीय लष्कराकडे सुपुर्द करण्यात आली?**
(१)आकाश (२)नाग (३)ब्राम्होस (४)अर्जुन

**प्र.४०–बाल्कन प्रदेश हा.....देशाच्या साम्राज्यात मोडणारा प्रदेश होता?**
(१)फ्रान्स (२)जपान (३)तुर्कस्तान (४)इटली

**प्र.४१–उगवत्या सूर्याचा देश म्हणून कोणत्या संबांधले जाते?**
(१)चीन (२)म्यानमार (३)जपान (४)द.कोरिया

**प्र.४२–जगात सर्वात जास्त लोकसंख्या असलेलस देश कोणता?**
(१)भारत (२)अमेरिका (३)ब्राझील (४)चीन

**प्र.४३–हिऱ्याच्या खाणी कोणत्या खंडात विपुल प्रमाणात आहे?**
(१)आफ्रीका (२)अंटार्टिका (३)अमेरिका (४)आशिया

**प्र.४४–जगातील सर्वात मोठा खंड कोणता?**
(१)आफ्रीका (२)अंटार्टिका (३)अमेरिका (४)आशिया

**प्र.४५–खालीलपैकी कोणता देश भारताचा शेजारी नाही?**
(१)चीन (२)पाककिस्तान (३)नेपाळ (४)फ्रान्स

**प्र.४६–जगातील सर्वात लांब नदी कोणती आहे?**
(१)ॲमेझॉन (२)नाईल (३)मिसिसीपी (४)सिंधू

**प्र.४७–जगाची विभागणी एकूण किती खंडात झाली आहे?**
(१)३ (२)५ (३)४ (४)७

**प्र.४८–.....ची सामुद्रधुनी अंदमान समुद्र व जावा समुद्र यांना जोडते?**
(१)पाल्क (२)मलाक्का (३)बेरींग (४)जिब्राल्टर

**प्र.४९–उष्ण व थंड सागरी प्रवाह एकत्र येतात त्या ठिकाणी....निर्माण होते.**
(१)बर्फ (२)दाट धुके (३)कमी तापमान (४)वारा

**प्र.५०–‘मरियाना गर्ता’ ही जगातील सर्वात खोल गर्ता....महासागरात आहे?**
(१)अटलांटिक (२)आर्क्टिक (३)पॅसिफिक (४)यापैकी नाही

**प्र.५१–सात बेटांचे शहर हे कोणत्या शहराला म्हणतात?**
(१)चेन्नई (२)मुंबई (३)कोलकत्ता (४)दिल्ली

**प्र.५२–जगातील लोकसंख्येत भारताचा कितवा क्रमांक आहे?**
(१)प्रथम (२)व्दितीय (३)तृतीय (४)चतुर्थ

**प्र.५३–साखरेचे कोठार कोणत्या देशाला म्हणतात ?**
(१)स्पेन (२)जापान (३)भुतान (४)क्युबा

**प्र.५४–खालीलपैकी कोणता देश सार्कचा सदस्य नाही ?**
(१)नेपाळ (२)भूतान (३)जापान (४)अफगाणिस्तान

**प्र.५५–.....हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण आहे?**
(१)नागपूर (२)भोपाळ (३)अमरावती (४)औरंगाबाद

**प्र.५६–भारतातील सर्वात मोठा जिल्हा कोणता?**
(१)अहमदनगर (२)कोलकाता (३)कच्छ (४)मुंबई

**प्र.५७–खालीलपैकी कोणत्या राज्याची सीमा पाकिस्तानच्या सीमेला लागून नाही?**
(१)पंजाब (२)राजस्थान (३)गुजरात (४)हरियाणा

**प्र.५८–राष्ट्रीय पोलीस अकॅडमी कोणत्या ठिकाणी आहे?**
(१)मसुरी (२)हैद्राबाद (३)नाशिक (४)डेहराडून

**प्र.५९–भारताचा सुमारे–––% भाग शेती लागवडीखाली आहे.**
(१)४०% (२)५०% (३)६०% (४)७०५

**प्र.६०–क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत हा जगातील.....क्रमांकाचा मोठा देश आहे?**
(१)पाचव्या (२)सहाव्या (३)चौथ्या (४)सातव्या

**प्र.६१–खालीलपैकी कोणते राज्य भारताच्या पूर्व किनाऱ्यावर वसलेले नाही?**
(१)केरळ (२)तामिळनाडू (३)आंध्र प्रदेश (४)ओरिसा

**प्र.६२–क्षेत्रफळाच्या दृष्टीने.....हे देशातील सर्वात मोठे राज्य आहे.**
(१)उत्तरप्रदेश (२)राजस्थान (३)मध्यप्रदेश (४)महाराष्ट्र

**प्र.६३–सरदार सरोवर प्रकल्प कोणत्या नदीवर आहे?**
(१)गंगा (२)गोदावरी (३)महानदी (४)नर्मदा

**प्र.६४– हैद्राबाद या शहरात खालीलपैकी कोणती संस्था आहे?**
(१)४८सकेंद (२)२०सकेंद (३)५६सकेंद (४)५२सकेंद

**प्र.६५–जन–गण–मन या भारतीय राष्ट्रगीत बायनाचा प्रमाणित कालावधी......सेंकद आहे?**
(१)४८सकेंद (२)२०सकेंद (३)५६सकेंद (४)५२सकेंद

**प्र.६६–सी.बी.आय.चे सध्याचे संचालक खालीलपैकी कोण आहेत?**
(१)एम.नागेश्वरराव (२)सुबोधकुमार जैस्वाल
(३)श्री.अनिल कुमार (४)श्री.अलोक जोशी

**प्र.६७–सध्याचे भारतीय नौदल संचालक खालीलपैकी काकेण आहेत?**
(१)श्री.आर.के.धवन (२)श्री.डि.के.जोशी
(३)श्री.व्ही.के.सिंग (४)करमवीर सिंग

**प्र.६८–महाराष्ट्रात वाहतूक पोलीस कोणत्या रंगाचा शर्ट घाल–तात?**
(१)पांढरा (२)खाकी (३)निळा (४)लाल

**प्र.६९–ट्रॅफीक पोलीस अतिवेग जाणाऱ्या वाहनांचा वेग माजण्यासाठी कोणत्या संत्राचा वापर करतात?**
(१)स्पीड मीटर (२)स्पीड ऑनालायझर
(३)स्पीड ॲपरेटर (४)स्पीड गन

**प्र.७०–आंतरराष्ट्रीय पोलीस संघटना कोणत्या नावाने ओळ–खली जाते?**
(१)Interpol (२)Internet (३)Unicef (४) Unipol

**प्र.७१–महिला पोलीसांची नेमणूक देशात सर्वप्रथम कोणत्या राज्यात केली गेली?**
(१)गोवा (२)महाराष्ट्र (३)गुजरात (४)केरळ

**प्र.७२–नुकतेच ग्र–हाऊस या कमांडोदलाचे जवान मलकामगिरी कोणत्या ठिकाणी नक्षलवाादी हल्ल्यात शहिद झाले होते?**
(१)छत्तीसगड (२)ओरिसा (३)झाररखंड (४)आंध्र प्रदेश

**प्र.७३–फिल्ड मार्शल माणेकशाँ हे खालीलपैकी कशाशी संबंधित होते?**
(१)शास्त्रज्ञ (२)राजकाररनी (३)लष्करी अधिकारी (४)गायक

**प्र.७४–अलिकडे जर्मन बेकरी कशामुळे चर्चेत आली आहे?**
(१)आंतरराष्ट्रीय दर्जाचे केक उत्पादन
(२)पोलीस चकमक (३)दहशतवादी हल्ला
(४)अग्नीकांड

**प्र.७५–२६/११ च्या मुबईवरील अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या सैन्य दलातील अधिकारी कोण?**
(१)आय.जी.पी.श्री.हेमंद करकरे
(२)डी.आय.जी.पी.श्री.अशोक कामटे
(३)मेजर श्री.उन्नीकृष्णन
(४)पी.ओयोश्रीरानिमखनी पृष्ठमाकर

**प्र.७६–ओसामा बिन लादेनला नेस्तनाबूत केलेल्या ऑपरेशनचे नाव काय?**
(१)नेप्च्युन स्पीअर (२)डेड एंड
(३)डेझर स्टॉर्स (४)स्माइलिंग बुध्दा

**प्र.७७–भारतीय नौसेनेत नुकत्याच सामील केलेल्या विमानवाहक नौकेचे नाव काय ?**
(१)विक्रमादित्य (२)शिवाजी (३)राणाप्रताप (४)चंद्रगुप्त

**प्र.७८–खालीलपैकी कोणत्या ठिकाणी पोलीस स्टेशन नाही?**
(१)बामणी (२)पिंपळदरी (३)राणीसावरगाव (४)दैठण

**प्र.७९–आय.पी.सी.म्हणजे काय?**
(१)भारतीय दंड संहिता (२)फौजदारी प्रक्रिया संहिता
(३)भारतीय पुरावा कायदा (४)यापैकी नाही

**प्र.८०–एखादा सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी लाच घेताना पकडला गेल्यास त्यावर पोलिसांचा कोणता विभाग मुख्यतः तपास करतो?**
(१)सी.आय.डी. (२)एस.आय.डी. (३)एल.सी.बी. (४)ए.टी.एम.

**प्र.८१–महाराष्ट्राचे दहशतवादी दलाचे मुख्यालय खालीलपैकी संक्षिप्त नावव काय?**
(१)ए.टी.एस. (२)ए..टी.सी (३)ए.बी.पी. (४)ए.टी.एम.

**प्र.८२–राज्य राखीव पोलीस दलाचे मुख्यालय खालीलपैकी कोणत्त्या ठिकाणी आहे?**
(१)पुणे (२)नागपूर (३)वसई (४)नारेगाव

**प्र.८३–दहशतवादी कारवायांवर प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र पोलीसांचा कोणता विभाग सक्रीय असतो?**
(१)जिल्हा पोलीस दल (२)गुन्हे विभाग
(३)ॲन्टी टेररिस्ट स्कॉड (४)बॉम्बशोधक व नाशक पथक

**प्र.८४–जी.आर.पी. म्हणजे काय?**
(१)गोवा रिपब्लीक पार्टी (२)गर्व्हमेंट रेल्वे पोलीस
(३)ग्रेटर मुबई रेल्वे पोलीस (४)गर्व्हनर रेल्वे पोलीस

**प्र.८५–रेल्वे पोलीस म्हणजेच....?**
(१)आर.पी.एफ (२)जी.आर.पी.
(३)एस.आर.पी (४)ए.टी.एस.

**प्र.८६–महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधीनी......येथे आहे.**
(१)पुणे (२)मुंबई (३)ठाणे (४)नाशिक

**प्र.८७–२६ नोव्हेंबर २००८ साली मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची चौकशी करणारी समिती कोणती ?**
(१)प्रधान समिती (२)पटेल समिती
(३)बसाक समिती (४)मेनन समिती

**प्र.८८–सोलार कुकरची आतील बाजूस ......... रंगानी रंगवलेली असते.**
(१)लाल (२)पिवळा (३)पांढरा (४)काळा

**प्र.८९–२०१४ चे अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन कोठे झाले?**
(१)पुणे (२)सासवड (३)ठाणे (४)नाशिक

**प्र.९०–संत तुकाराम यांचे जन्म भूमी कोणती आहेत?**
(१)पैठण (२)आळंदी (३)देह (४)पंढरपूर

**प्र.९१–इंटरनेट ॲनलॉग व डिजीटर सिग्रलचे एकमंकांमध्ये रूपांतर करून संगणक प्रणालीमण्ये माहितीची देवाण–घेवाण करण्यासाठी कोणते उपकरण वापरतात?**
(१)मोडेम (२)वेबकॅम (३)इंटरकॉम (४)पेन ड्राईव्ह

**प्र.९२–सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली?**
(१)आत्माराम पांडूरंग (२)गोपाल हरी देशमुख
(३)म.गो.रानडे (४)ज्योतिबा फुले

**प्र.९३–ठाणे जिल्ह्यात किती लोकसभा मतदार संघ आहेत?**
(१)३ (२)४ (३)५ (४)२

**प्र.९४–तारापूर अणुऊर्जा प्रकल्प कोणत्या तालुक्यात आहे?**
(१)कल्याण (२)भिवंडी (३)पालघर (४)शहापूर

**प्र.९५–ठाणे जिल्ह्यातील मलंगगड हा किल्ला कोणी बांधला?**
(१)छत्रपती शिवाजी महाराज (२)छत्रपती संभाजी महाराज
(३)शिलाहार राजा (४)रामदेवराय यादव

**प्र.९६–सिक्किम या राज्याची राजधानी कोणती ?**
(१)कोहिमा (२)अगरतळा (३)गंगटोक (४)गौहाटी

**प्र.९७–खालीलपैकी शुध्द शब्द ओळखा?**
(१)अधपतन (२)अधोपतन (३)अधःपतन (४)अधीपतन

**प्र.९८–भारताचे पितामह कोणास म्हणतात?**
(१)लोकमान्य टिळक (२)महात्मा गांधी
(३)दादाभाई नौरोजी (४)न्यायमूर्ती रानडे

**प्र.९९–बिस्मीला खान : सनई :: रविशंकर : ?**
(१)नृत्य (२)बासरी (३)सतार (४)तबला

**प्र.१००–ताडोबा राष्ट्रीय उद्यान कोणत्या जिल्ह्यामध्ये आहे?**
(१)गडचिरोली (२)गोंदिया (३)चंद्रपूर (४)नागपूर

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे-** (१) ३ (२) ३ (३) २ (४) ४ (५) ४ (६) ४ (७) ४ (८) २ (९) २ (१०) १ (११) १ (१२) ४ (१३) ३ (१४) ४ (१५) २ (१६) ४ (१७) १ (१८) १ (१९) ४ (२०) २ (२१) ४ (२२) ४ (२३) ३ (२४) ४ (२५) ३ (२६) ३ (२७) ४ (२८) ४ (२९) २ (३०) १ (३१) ३ (३२) २ (३३) १ (३४) २ (३५) ४ (३६) २ (३७) १ (३८) ४ (३९) १ (४०) ३ (४१) ३ (४२) ४ (४३) १ (४४) ४ (४५) ४ (४६) २ (४७) ४ (४८) २ (४९) २ (५०) ३ (५१) २ (५२) २ (५३) ४ (५४) ३ (५५) १ (५६) ३ (५७) ४ (५८) ४ (५९) ३ (६०) ४ (६१) १ (६२) २ (६४) १ (६५) ४ (६६) २ (६७) ४ (६८) १ (६९) ४ (७०) १ (७१) ३ (७२) १ (७३) ३ (७४) ३ (७५) ३ (७६) १ (७७) १ (७८) ३ (७९) १ (८०) ४ (८१) १ (८२) ४ (८३) ३ (८४) २ (८५) १ (८६) १ (८७) १ (८८) ४ (८९) २ (९०) ३ (९१) १ (९२) ४ (९३) २ (९४) ३ (९५) २ (९६) ३ (९७) ३ (९८) ३ (९९) ३ (१००) ३

# जगातील सर्वात शक्तिशाली रॉकेट स्टारशिपची ९ वी चाचणी फेल

**–थ्वीच्या वातावरणात येताच नष्ट**
**–सलग तिसऱ्यांदा मस्क यांच्या मोहिमेला धक्का**

जगातील सर्वात शक्तिशाली रॉकेट स्टारशिपची ९ वी चाचणी यशस्वी झाली नाही. प्रक्षेपणानंतर सुमारे ३० मिनिटांनी स्टारशिपने नियंत्रण गमावले, ज्यामुळे ते पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना नष्ट झाले. आकाशात स्टारशिप नष्ट होण्याची ही सलग तिसरी वेळ आहे. तथापि, बूस्टरने अमेरिकेच्या आखातात हार्ड लँडिंग केले. लँडिंग बर्न दरम्यान, बॅकअप इंजिनची क्षमता तपासण्यासाठी सेंटर इंजिन जाणूनबुजून बंद करण्यात आले. या चाचणीत, पहिल्यांदाच, ७व्या चाचणीत वापरलेले बूस्टर पुन्हा वापरले गेले आहे.

गळतीमुळे मुख्य टाकीचा दाब कमी झाला

भारतीय वेळेनुसार आज म्हणजेच २८ मे रोजी पहाटे पाच वाजता टेक्सासच्या बोका चिका येथून स्टारशिपचे प्रक्षेपण करण्यात आले. स्टारशिप अंतराळयान (वरचा भाग) आणि सुपर हेवी बूस्टर (खालचा भाग) यांना एकत्रितपणे ’स्टारशिप’ म्हणतात. हे रॉकेट जगातील सर्वात श्रीमंत उद्योगपती एलोन मस्क यांच्या कंपनी स्पेसएक्सने बनवले आहे. या वाहनाची उंची ४०३ फूट आहे. ते पूर्णपणे पुन्हा वापरता येण्याजोगे आहे.

गळतीमुळे मुख्य टाकीचा दाब कमी झाला

या चाचणीनंतर, एलोन मस्क म्हणाले की, स्टारशिपने निर्धारित जहाज इंजिन कटऑफ गाठला, त्यामुळे मागील उड्डाणाच्या तुलनेत बरीच सुधारणा झाली आहे. गळतीमुळे किनारपट्टी आणि पुनर्प्रवेश टप्प्यादरम्यान मुख्य टाकीचा दाब कमी झाला. आता पुढील तीन प्रक्षेपणे खूप जलद असतील. जवळजवळ दर ३ ते ४ आठवड्यांनी एक प्रक्षेपण होईल.

मोहिमेचे उद्दिष्ट : कमतरता दूर करणे आणि आवश्यक प्रयोग करणे

स्टारशिपच्या वरच्या भागाचे हिंद महासागर नियंत्रित जल–लँडिंग करायचे होते, जे होऊ शकले नाही. याशिवाय, पेलोड तैनात करणे आणि अवकाशात असताना रॅप्टर इंजिन सुरू करणे असे प्रयोग केले जाऊ शकले नाहीत. बूस्टरच्या लँडिंग बर्न दरम्यान एक विशेष इंजिन कॉन्फिगरेशन प्रदर्शित करण्यात आले. मधल्या रिंगचे बॅकअप इंजिन लँडिंग पूर्ण करू शकते की नाही हे तपासण्यासाठी लँडिंगच्या शेवटच्या टप्प्यात तीन सेंटर इंजिनपैकी एक जाणूनबुजून बंद करण्यात आले. बूस्टर फक्त दोन सेंटर इंजिनवर स्विच केले. लँडिंग बर्नच्या शेवटी, जेव्हा ते अमेरिकेच्या आखातावर होते, तेव्हा इंजिन बंद करण्यात आले. यानंतर बूस्टरने पाण्यात हार्ड लँडिंग केले.

तीन महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे

१. आजची चाचणी उड्डाण यशस्वी झाली की नाही?

स्पेसएक्स सहसा चाचणी उड्डाणांना संशोधनातील यशस्वी कामगिरी म्हणून सादर करते. अशा चाचण्यांमध्ये यश हे आपण जे शिकतो त्यावरून येते आणि आजची चाचणी स्टारशिपची विश्वासार्हता सुधारण्यास मदत करेल, असे कंपनीने ट्विटमध्ये म्हटले आहे. परंतु स्टारशिप अनेक महत्त्वाचे चाचणी टप्पे गाठण्यात अयशस्वी ठरली, जसे की मॉक सॅटेलाइट तैनात करण्याचा प्रयत्न करणे आणि अवकाशात त्याचे इंजिन पुन्हा सुरू करणे.

२. या मोहिमांसाठी कोण पैसे देते?

स्पेसएक्स बहुतेक खर्च स्वतः उचलते. तथापि, नासाने स्पेसएक्ससोबत ४ अब्ज डॉलर्सचा करार देखील केला आहे. या कराराअंतर्गत, स्टारशिपचा वापर मानवांना चंद्रावर पाठवण्यासाठी केला जाईल. नासा विविध टप्पे गाठण्यासाठी टप्प्याटप्प्याने कंपनीला ही रक्कम देते. मस्क म्हणाले आहेत की प्रत्येक स्टारशिप चाचणी उड्डाणाची किंमत सुमारे ५० दशलक्ष ते १०० दशलक्ष आहे.

३. हे स्फोट धोकादायक आहेत का?

आतापर्यंत, स्टारशिपच्या कोणत्याही अयशस्वी मोहिमेतून भौतिक नुकसान किंवा दुखापत झाल्याचे कोणतेही वृत्त नाही. पण जानेवारीमध्ये झालेल्या स्फोटानंतर, दक्षिण कैकोसमध्ये स्टारशिपचे काही तुकडे एका कारवर पडले,.. **पुढील वृत्त पान ८ वर..**

# MPSC राज्य (पूर्व) परिक्षा प्रश्न सराव पेपर

**प्र.१-'मराठी सत्तेचा उदय' हा ग्रंथ कोणी लिहीला.**
(१)लोकमान्य टिळक (२)न्यायमूर्ती रानडे
(३)महात्मा फुले (४)गोपाळ कृष्ण गोखले

**प्र.२-भारताचा पहिला व्हाइसरॉय कोण?**
(१)रॉबर्ट क्लाईव्ह (२)वॉरन हेस्टिंग्ज
(३)विल्यम बेंटिंग (४)लॉर्ड कॅनिंग

**प्र.३-खालीलपैकी कोणी सन१९४३ मध्ये बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळसंदर्भात अभयास केला?**
(१)केशवचंद्र सेन (२)जगदीशचंद्र बोस
(३)अमर्त्यकुमार सेन (४)प्रा.व्ही.एम.दांडेकर

**प्र.४-'सरहद्द गांधी' म्हणून कोणास ओळखले जाते?**
(१)डॉ.झाकीर हुसेन (२)लियाकत अली
(३)फक्रुद्दिन अली अहमद (४)खान अब्दुल खफारखान

**प्र.५-'सत्यशोधक समाजा'ची स्थापना कोणी केली?**
(१)दयानंद सरस्वती (२)राजा राममोहन रॉय
(३)केशवचंद्र सेन (४)महात्मा जोतिबा फुले

**प्र.६-स्वामी दयानंद सरस्वतींचे एक महत्वाचे येगदान म्हणजे त्यांनी......**
(१)जातिभेदाचा नायनाट केला.
(२)गुणवत्तेप्रमाणे जातिव्यवस्थेचा पुरस्कार केला.
(३)सामाजिक समता या तत्वाचे प्रतिपादन केले.
(४)वैदिक तत्वज्ञानास प्राधान्य दिले.

**प्र.७-सन १९२९ च्या लाहोर काँग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव कोणी मांडला?**
(१)मोतीलाल नेहरू (२)चित्तरंजन दास
(३)जवाहरलाल नेहरू (४)सुभाषचंद्र बोस

**प्र.८-डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले;कारण.........**
(१)उच्चवर्गीय हिंदूंनी त्यांना ती अभयासण्यास मज्जाव केला होता.
(२)ती संस्कृतमध्ये लिहिलेली होती.
(३)त्यांच्या मते,मनुस्मृतीने अस्पृश्यांवर अनंत काळ सामाजिक,आर्थिक,धार्मिक व राजकीय गुलामगिरी लादली होती.
(४)त्यांच्या अनुयायांनी त्यांना तसे करण्याचा सल्ला दिला.

**प्र.९-'सर्वजनिक सत्यधर्म' पुस्तक कोणी लिहिले?**
(१)डॉ.बाबासाहेब आंबेडकर (२)दयानंद सरस्वती
(३)महात्मा जोतीबा फुले (४)बाबा आमटे

**प्र.१०-दक्षिण-उत्तर व पूर्व-पश्चिम या स्वरूपाचे वैशिष्ट्यपूर्ण 'भारत जोडो' अभियान राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रचारासाठी कोणी आयोजित केले होते?**
(१)आचार्य विनोबा भावे (२)बाबा आमटे
(३)बाबा आढाव (४)आचार्य दादा धर्माधिकारी

**प्र.११-खालीलपैकी कोणती संस्था विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्थापन केली आहे?**
(१)रामकृष्ण मिशन (२)प्रार्थना समाज
(३)ब्राम्हो समाज(४)डिप्रेड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया

**प्र.१२-'जात्युच्छेदक निबंध' हा ग्रंथ कोणी लिहीला?**
(१)महात्मा जोतीबा फुल (२)लोहितवादी
(३)गो.ग.आगरकर (४)स्व सावरकर

**प्र.१३-खालीलपैकी कोणत्या प्रक्रियेतून हिमालय पर्वत निर्माण झाला?**
(१)भ्रंश (२)वली प्रक्रिया
(३)दरडी कोसळणे (४)ज्वालामुखीय उद्रेक

**प्र.१४-खालीलपैकी कोणती नदी महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेशातून वाहते?**
(१)लाल माती (२)गाळाची माती (३)रेगूर माती (४)भाबर

**प्र.१५-'सुंदरबन' ची निर्मिती खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या मृदेच्या संचयनाने झाली?**
(१)चेन्नई (२)हैदराबाद (३)सिकंदराबाद (४)कोलकाता

**प्र.१६-भारतातील दक्षिण रेल्वे विभागाचे मुख्यालय कोणते?**
(१)चेन्नई (२)हैदराबाद (३)सिकंदराबाद (४)कोलकाता

**प्र.१७-खालीलपैकी कोणत्या दोन ठिकाणांच्या दरम्यान भारता-तील पहिला रेल्वेमार्ग तयार केला गेला?**
(१)मुंबई-पुणे (२)आपटा-रोहा (३)मुंबई-ठाणे (४)ठोणे-बेलापूर

**प्र.१८-खालीलपैकी कोणते बंदर गुजरातमध्ये सर्वाधिक महत्वाचे आहे?**
(१)पोरबंदर (२)सुरत (३)कांडला (४)दीव

**प्र.१९-भारत हे गणराज्य आहे;कारण.........**
(१)भारतात राष्ट्रप्रमुख जनतेकडून विशिष्ट कालावधीसाठी अप्रत्यक्षरीत्या निवडला जातो.
(२)भारतात संसदीय शासनपध्दती आहे.
(३)भारत पूर्णपणे स्वतंत्र आहे.
(४)भारताने लोकशाही शासनाचा स्वीकार केला आहे.

**प्र.२०-राज्याच्या धोरणांच्या मार्गदर्शक तत्वांविषयी खालीलपैकी काय बरोबर आहे?**
(१)त्याच्याबाबतीत न्यायालयात दाद मागता येत नाही.
(२)ती न्यायप्रविष्ट होऊ शकतात.
(३)काही मार्गदर्शक तत्वेच फक्त न्यायप्रविष्ट होऊ शकतात.
(४)वरीलपैकी एकही नाही.

**प्र.२१-भारत सरकारने १६५३ मध्ये नियुक्त केलेल्या 'राज्य पूर्नरचना आयोग'चे अध्यक्ष कोण?**
(१)हृदयनाथ कुंझरु (२)के.एम.पण्णीकर
(३)फाजल अली (४)के.एम.मुन्शी

**प्र.२२-कोणत्या घटनादुरुस्ती अन्वये राज्यघटनेतील संपत्तीचा मूलभूत अधिकार वगळण्यात आला?**
(१)एकोणचाळिसाव्या (२)चव्वेचाळीसाव्या
(३)बेचाळीसाव्या (४)एकसष्टाव्या

**प्र.२३-राष्ट्रपतींकडून राज्यसभेवर किती सदस्य नियुक्त केले जातात?**
(१)आठ (२)दहा (३)बारा (४)तीस

**प्र.२४-भारताचा घटनात्मक प्रमुख कोण आहे?**
(१)राष्ट्रपती (२)राज्यपाल (३)पंतप्रधान (४)सरन्यायाधीश

**प्र.२५-पंचायती राज्य संस्थापैकी कोणत्या संस्थेला बलवंतराय मेहता समितीने सर्वाधिक महत्त्व दिले?**
(१)जिल्हा परिषद (२)पंचायत समिती
(३)ग्रामपंचायत (४)ग्रामसभा

**प्र.२६-महाराष्ट्रात जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचा अध्यक्ष कोण असतो?**
(१)जिल्हाधिकारी (२)जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष
(३)जिल्हा परिषदेचा अध्यक्ष(४)मुख्य कार्यकारी अधिकारी

**प्र.२७-खालीलपैकी कोणत्या समितीने 'ग्रामपंचातीच्या सरपंचाची निवड प्रत्यक्षरित्या लोकांकडून करावी' अशी शिफारस केली?**
(१)पी.बी.पाटील समिती (२)व्ही.पी.नाईक समिती
(३)अशोक मेहता समिती (४)बेगिरवार समिती

**प्र.२८-खालीलपैकी कोणता विकास कायक्रम पंचायती राज्य व्यवस्थेत विलीन करण्यात आला?**
(१)सामूहिक विकास (२)एकात्मिक ग्रामीण विकास
(३)आर्थिक व सामाजिक विकास (४)जवाहर ग्रामीण विकास

**प्र.२९-तलाठ्याची नेमणूक करण्याचा अधिकार कोणास आहे?**
(१)राज्य शासन (२)तहसीलदार (३)प्रांताधिकारी (४)जिल्हाधिकारी

**प्र.३०-पंचायत समिती विसर्जित करण्याचा अधिकार खालीलपैकी कोणास आहे?**
(१)विळागीय आयुक्त (२)जिल्हाधिकारी
(३)राज्य सरकार (४)यापैकी नाही

**प्र.३१-'कारणानेकतेचा सिध्दान्त' हा शास्त्रीय दगष्टिकोनातून ....आहे.**
(१)विश्वासनीय (२)अविश्वासनीय (३)अचूक (४)निश्चित

**प्र.३२-कारण हे........असते.**
(अ)पर्ववर्ती घटना (ब)नित्यपर्ववर्ती घटना
(१)फक्त (अ) सत्य आहे. (२) फक्त (ब)सत्य आहे.
(३)(अ) व (ब) दोन्ही असत्य आहे. (४) फक्त (ब)असत्य आहे.

**प्र.३३-'अभ्युपगम'(Hypothesis)हे..सुचकवले जाऊ शकते.**
(१)केवळ गणनात्मक विगमनान (२) सामान्य विधानाचे परिवर्तन केल्याने
(३)साम्यानुमानाने (४)वरील सर्व पध्दतीने

**प्र.३४-वैज्ञानिक संशोधनासंबंधी खालील विधाने विचारात घ्या.**
(अ)त्यामध्ये निरीक्षण अंतर्भूत असते.
(ब)अभ्युपगम तयार केला जातो.
(क)सामान्यीकरण अंतर्भूत असते.
(ड)प्रचिती अंतर्भूत असते. वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहे/आहेत.
(१)फक्त (अ) (२)(अ) आणि (ब)
(३)(अ),(ब) आणि (क) (४) (अ),(ब),(क) आणि(ड)

**प्र.३५-खालील विधाने विचारात घ्या. (ए आर आर)(ए): प्रचिती ही अभ्युपगमाची सिध्दता होय. (आर): अभ्युपगमाची प्रचिती व सिध्दता याच्यात फरक आहे.**
(१)फक्त (ए) बरोबर आहे. (२)फक्त (आर) बरोबर आहे.
(३)(आर) चूकीचे आहे. (४)(ए) व (आर)चूकीचे आहे.

**प्र.३६-खालीलपैकी कोणती वैज्ञानिक पध्दती आहे?**
(१)शास्त्रीय विगमन (२)केवल गणना
(३)अभ्युपगमात्मक निगमन (४)साम्यानुमान

**प्र.३७-पाश्चात्यीकरणाची कल्पना ...... यांनी मांडली.**
(१)आर.एस.राव (२)एस.एन.राव (३)जी.एन.स्मिथ (४)कृष्णाराव

**प्र.३८-भारतातील आधुनिकीकरण फारच अवघड आहे;याचे कारण म्हणजे .......**
(१)पारंपरिक समाज (२)जातिव्यवस्थेच पगडा
(३)प्रातिक समाज रचना (४)वरील सर्व

**प्र.३९-भारतातील नद्या वरील प्रकल्प बरचसे रखडत आहेत; याचे कारण......**
(१)संकुचित वृत्ती आणि प्रातिकवाद (२)तांत्रिक अकुशलता
(३)बेसुमार लोकसंख्या (४)पाण्याचा तुटवडा

**प्र.४०-'प्राथमिक आधुनिकीकरण' हे ...... स्वरूपाचे असते.**
(१)प्रगल्भ (२)पूर्व नियोजित (३)स्वायत्त (४)परावलंबी

**प्र.४१-आधुनिक समाजामध्ये सामाजिक नियंत्रणाला ...... स्थान असते.**
(१)महत्वाचे (२)दुय्यम (३)साधारण (४)अनन्यसाधारण

**प्र.४२-भारतीय समाजाला आधुनिक करण्याचे कार्य ........ केले आहे असे म्हणता येईल.**
(१)ब्रिटिश राज्यकर्त्यांनी (२)भारतीय जमिनदारांनी
(३)भारतीय उच्चभ्रू वर्गाने (४)भारतीय शिक्षण प्रणालीने

**प्र.४३-इस्त्रोतर्फे राबविला जाणारा 'इन्सॅट मालिका' हा कार्यक्रम व्यापारी दृष्ट्या फायदेशीर ठरू शकेल का?**
(१)होय (२)नाही (३)कदाचित. (४)कदाचित नाही

**प्र.४४-द्रवरूप हेवकत खालील घटनांचे मिश्रण असते.......**
(१)द्रव नायट्रोजन आणि ऑक्सिजन
(२)द्रव हायट्रोजन आणि ऑक्सिजन
(३)द्रव कार्बन-डाय-ऑक्साइड व हायट्रोजन
(४)द्रव ब्युटेन आणि प्रोपेन

**प्र.४५-ठिबक सिंचन पध्दतीमुळे चिकण मातीचा ओलाभाग असतो..**
(१)अरूण (२)रुंद (३)खोल (४)उथळ

**प्र.४६-'इरॉस-४३३' या लघुग्रहावर उतरणारे नासाच्या (अमेरिका) उपग्रहाचे नाव........**
(१)निअर शूमाकर (२)चॅलेंजर (३)पाथ फाईडर (४)शूमेकर लेव्ही

**प्र.४७-अवकाश कॅमेऱ्याव्दारे पृथ्वीवर पाठविलेल्या छायाचित्रांचा उपयोग खालील बाबींकरता होतो.........**
(१)दुष्काळी पूर्वकल्पना (२)पुराची संभाव्यता
(३)भू-जल सर्वेक्षण (४)वरील सर्वांकरिता

**प्र.४८-मोटार ही सर्वोत्तम मानली लाईल, जेव्हा........**
(१)तिच्यामुळे कमी प्रदुषण होईल.
(२)ती अधिक सुरक्षित असेल.
(३)तिच्यात जास्तीत जास्त सुखसोयी असतील.
(४)वरील सर्व गोष्टी तिच्यात असतील.

**प्र.४९-समाजाच्यासंस्कृती हस्तांतरांचे..हे सर्वात प्रभावी माध्यम आहे.**
(१)कला (२)साहित्य (३)भाषा (४)विचारप्रणाली

**प्र.५०-कारखानदारीमध्ये प्रत्यक्ष उत्पादनात भाग घेणारा घटक ...... हा असतो.**
(१)तज्ज्ञ (२)व्यवस्थापक (३)फोरमन (४)कामगार

**प्र.५१-'ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस'ची स्थापना .......या वर्षी करण्यात आली.**
(१)१९४७ (२)१९११ (३)१९१९ (४)१९२०

**प्र.५२-'सामाजिक सुरक्षितता योजने'ची सुरूवात सर्व प्रथम ....... या देशात झाली.**
(१)जर्मनी (२)भारत (३)इंग्लंड (४)अमेरिका

**प्र.५३-कारखान्यातील 'कामगारांचा कंटाळा' हाप्रामुख्याने ..... चा परिणाम असतो.**
(१)तेच ते काम (२)कारखान्यातील वातावरण
(३)व्यवस्थापना (४)कामगार फोरमन यांचे संबंध

**प्र.५४-व्यवस्थापन व कामगार वर्ग यांच्यातील संघर्षाची मूळ कारण ......... हे आहे.**
(१)मतभेद (२)वेतन (३)वर्गसंघर्ष (४)सामाजिक उणिवा

**प्र.५५-पुष्कळशा प्रगतशील देशांत रोगराईची मृत्यूची तीन महत्वाची कारणे आहेत.......**
(१)चांगल्या पीण्याच्या पाण्याचा अभाव, कीटक-नाशक औषधांचा वाढता उपयोग आणि ओझोनचा पातळ थर.
(२)दूषित अन्न,सर्वव्यापी उष्ण वातावरण आणि औद्योगिक कलोरो-फलुरो-कार्बन्स.
(३)प्रदूशित हवा, हरत गृह परिणाम आणि जमिनीची झीज.
(४)दूषित अन्न-पाणी व प्रदूषित हवा.

**प्र.५६-आर्थिक वाढीशी संबंधित असलेले जन्म-मृत्यू यांचे क्रमवार स्थित्यंतर खालीलपैकी कोणत्या प्रणालीने दाखविता येईल?**
(अ)वाढते जन्मप्रमाण-वाढते मृत्यूप्रमाण
(ब)घटते जन्मप्रमाण-घटते मृत्यूप्रमाण
(क)वाढते जन्मप्रमाण-घटते मृत्यूप्रमाण
(१)(अ),(ब),(क) (२)(क),(अ),(ब)
(३)(ब),(अ),(क) (४)(अ),(क),(ब)

**प्र.५७-अल्पसंख्यांकाचे आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या असलेले मागासले पण नाहीसे करण्यासाठी शासन कोणता कार्यक्रम विस्तारित करित आहे?**
(१)संकलित ग्रामविकास योजना (२)जवाहर रोजगार योजना
(३)पंधरा कलती कार्यक्रम (४)वरील सर्व

**प्र.५८-खालीलपैकी कोणत्या धातूमुळे जास्त मोटरगाड्या असलेल्या शहरात हवेचे प्रदुषण निर्माण होते?**
(१)तांबे (२)क्रोमीअम (३)लोखंड (४)शिसे

**प्र.५९-विद्यावपीठीय शिक्षणाचा दर्जा,शैक्षणिक विकास व संशोधन यांच्याशी संबंधित असलेले सल्लागार मंडळ.......**
(१)राष्ट्रीय वैज्ञानिक व ज्ञानवर्धक संस्था
(२)राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(३)विद्यापीठ अनुदान आयोग
(४)भारतीय वैज्ञानिक संस्था

**प्र.६०- दहा वर्षांचा काळ धरता लोकसंख्येच्या वार्षिक वाढीच्या प्रमाणाचा चांगला दर्शक म्हणजे........**
(१)अंकगणितीय वार्षिक वाढीचे प्रमाण.
(२)उत्तरोत्तर सुधारत जाणारे वाढीचे प्रमाण.
(३)सरासरी वार्षिक प्रमिनीधीरूप वाढीचे प्रमाण.
(४)दहा वर्षीय वाढ भागिले दहा.

**प्र.६१-भारताच्या'निर्यात पत हमी ममहामंडळा'चे प्राथमिक उद्दिष्ट आहे......**
(१)भारताच्या आयातीत वाढ करणे.
(२)भारताच्या निर्यातीत घट करणे.
(३)भारताच्या निर्यातीविरूध्दी माहिमेला सहकार्य करणे व ती बळकट करणे.
(४)(१) व (२)

**प्र.६२-'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी' ची स्थापना.......**
(१)२७डिसेंबर,१९४५ (२)१ मार्च,१९४७
(३)१५ ऑगस्ट,१९४७ (४)१ जानेवारी,१९४८

**प्र.६३-आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरविभागीय व्यापार यांमध्ये एक साम्य आहे; ते म्हणजे दोन्हींही मध्ये साधारणपणे खालील अडणींना तोंड द्यावे लागते........**
(१)भाषा भिन्नता (२)प्रदेशिक अंतर
(३)जकात किंवा सीमाशुल्क (४)गुंतागुंतीची चलन व नाणेव्यवस्था

**प्र.६४-जगातील सर्व देश अशा मालासाठी एकमेकांवर अवलंबून असतात की, ज्या मालाची/चे त्या देशात.......**
(१)जास्तीचे उत्पादन आहे. (२)कमतरता आहे.
(३)आधुनिक तंत्रज्ञान आहे.(४)मोठ्या प्रमाणावर उत्पादन आहे.

**प्र.६५-नियोजन कालखंडाच्या प्रारंभापासून भारतातील परकीय व्यापाराची उलाढाल.........**
(१)वाढत आहे. (२)कमी होत आहे.
(३)बदल न होता तेवढीच आहे. (४)गणना केली नाही.

**प्र.६६-६ जून, १९९६६ रोजी भारताने रुपयाचे अवमूल्यन .........टक्क्यांनी केले.**
(१)३५.६ (२)४५.५ (३)३६.५ (४)३३.६

**प्र.६७-खालीलपैकी कोणत्या बँकेला ग्रामीण पायाभूत सेवा नीधीचे व्यवस्थापन करण्याची परवानगी दिली आहे?**
(१)रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (२)प्रदेशिक ग्रामीण बँक
(३)राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (४)अग्रणी बँक

**प्र.६८-रोख पुस्तक व ग्राहक पुस्तकातील लेख्यांतील शिलकीत पडणारा फरक पडताळण्यासाठी बँका कोणते विविरण तयार करतात?**
(१)चुकांची दुरुस्ती विवरण (२) विक्रय विवरण
(३)अधिकोश, समाधान विवरण (समासोजना) (४) स्थिती विवरण

**प्र.६९-प्राथमिक सहकारी पतसंस्थेवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवणारी जवळची बँक कोणती?**
(१)भारतीय स्टेट बँक (२)अग्रणी बँक
(३)भारतीय रिझर्व्ह बँक (४)जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

**प्र.७०-गट-पत-पुरवठा योजना खालीलपैकी कोणती संस्था तयार करते?**
(१)जिल्हा नियोजन आणि विकास परिषद (२)ग्रामीण विकास यंत्रणा
(३)पंचायत समिती (४)अग्रणी बँक

**प्र.७१-सन १९९३-९४ मध्ये खालीलपैकी कोणत्या बँकेला सर्वात जास्त तोटा झाला होता?**
(१)बँक ऑफ इंडिया (२)सेंट्रल बँक ऑफ इंडिया
(३)युनायटेड बँक ऑफ इंडिया (४) युको बँक

**प्र.७२-वाणिज्य अधिकोशाच्या आवश्यकतेनुसार कोणी भर दिला होता?**
(१)बँकिंग कमिशन (२)पाचवा वित्त आयोग
(३)सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज ऑफ इंडिया (४)यापैकी नाही

**प्र.७३-विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये कोणती कर योजना योग्य ठरते?**
(१)करारोपणविहीन (२)न्यून प्रमाण करारोपण
(३)पगमनशील करारोपण (४)अनुपातशील करारोपण

**प्र.७४-सरकारी व्यवहाराचे स्वरूप कोणते?**
(१)हाताने करता येण्यासारखे (२)कार्यात्मक
(३)सामान्य सेवा (४)यापेक्षा वेगळे उत्तर

**प्र.७५-खालीलपैकी कोणत्या बाबी ऐमकांशी घनिष्ट व प्रत्यक्ष संबंधित आहेत?**
(अ)तुटीचे अर्थप्रबंधन (ब)चलन - पुरवठा
(क)किंमतीची पातळी (ड)शोधनाधिक्य
(१)फक्त (अ),(ब) (२)सर्व
(३)फक्त (अ),(ब),(क) (४)फक्त(क),(ड)

**प्र.७६-'दही' हा कोणत्या प्रकारचा दुग्धजन्य पदार्थ आहे?**
(१)आंबविण्याचे प्रक्रिया केलेला. (२)उष्णतेमुळे तयार झालेला.
(३)घट्ट केलेला (४)यापेक्षा वेगळे उत्तर

**प्र.७७-खालीलपैकी कोणत्या फळपिकापासून महाराष्ट्राला सर्वाधिक परकीय चलन मिळते?**
(१)केळी (२)संत्री (३)आंबा (४)द्राक्ष

**प्र.७८-केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पाचे अभिभाषण खालीलपैकी कोण करतात?**
(१)केंद्रीय अर्थमंत्री (२)पंतप्रधान
(३)लोकसभा सभापती (४)राष्ट्रपती

**प्र.७९-खालीलपैकी कोणत्या वृक्षाला 'गरिबांच्या इमारती लाकूड' म्हणून संबोधले जाते?**
(१)सुरू (२)काशीद (३)जांभूळ (४)बांबू

**प्र.८०-पहिला'वीस कलमी कार्यक्रम' कोणी जाहीर केला?**
(१)जवाहरलाल नेहरू (२)लाल बहादूर शास्त्री
(३)राजीव गांधी (४)इंदीरा गांधी

**प्र.८१-'अधिक उत्पादन देणाऱ्या जाती कार्यक्रम'कोणत्या पीकापूरता मर्यादित होता?**
(१)फक्त गहू (२)बिगर अन्न पिके (३)गहू, तांदूळ, ज्वारी
(४) गहू, तांदूळ, ज्वारी,बाजरी,मका

**प्र.८२-'सर्वासाठी किमान राजगाराची पातळी' हे कोणत्या योजनेचे उद्दिष्ट्य होते?**
(१)तिसरी योजना (२)चौथी योजना
(३)पाचवी योजना (४)सातवी योजना

**प्र.८३-शेतीक्षेत्रातील बेकारीला .......म्हणतात.**
(१)पूर्ण बेरोजगारी (२)अर्ध बेरोजगारी
(३)घर्षणजन्य बेरोजगारी (४)प्रच्छन्न बेरोजगारी

**प्र.८४-पाचव्या पंचवार्षिक योजनेचा परवलीचा शब्द कोणता होता?**
(१)जलदप्रगती (२)अधिक रोजगारी
(३)उत्पन्नाचे समवाटप (४)गरिबी हटाव

**प्र.८५-सामान्यपणे मुद्रास्फीती म्हणजे ........ होय?**
(१)मुद्रामागणीच्या सापेक्ष मुद्र पूरववठ्यात वाढ (२)मुद्रेचे मूल्य घटते.
(३)व्याज व नफा दरात वाढ (४)वरील सर्व

**प्र.८६-राज्य व्यापार व अन्न धान्याचेसाठे करण्याचे कार्य.. करते?**
(१)सार्वजनिक आरोग्य विभाग (२)शेतकी मंत्रालय
(३)राज्य शासन (४)भारती अन्न महामंडळ

**प्र.८७-सातव्या पंचवार्षिक योजनाकाळातील तुटीच्या अर्थभरण्याची संकल्पीत रक्कम होती रु.......**
(१)१,२०० (२)१,४०० (३)१,५०० (४)वरीलपैकी नाही

**प्र.८८-सन १९८१-८२ च्या किंमतीनुसार डिंसेबर,१९९१ मधील घाऊक किमतीचा निर्देशांक ....... इतका होता.**
(१)२११.३ (२)१७१.२ (३)१३४.५ (४)१२८.५

**प्र.८९-रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ........ची पतनिर्मितीची क्षमता कमी करण्यासाठी रोख राखीव निधीचा वापर केला.**
(१)परकीय विनिमय बँक (२)व्यापारी बँका
(३)नागरी सहकारी बँका (४)सहकारी पतसंस्था

**प्र.९०-सातव्या पंचवार्षिक योजनाकाळात किंमतीपातळीत दरसाल...टक्के वाढ झाली?**
(१) ४ (२) ५ (३) ६ (४) ७

**प्र.९१-कडधान्य पिकांची उत्पादकात वाढविण्यासाठी येणारी प्रमुख अडचण कोणती?**
(१)कीड व रोगराईमुळे नुकसान होते.
(२)अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांची उपलब्धता नसणे.
(३)न्हायझाबियम जिवाणू खतांचा तुरळक वापर.
(४)वरील सर्व.

**प्र.९२-खालीलपैकी कोणत्या भाजीपाला पीकाचे सर्वात जास्त क्षेत्र व उत्पादन महाराष्ट्र राज्यात आढळते?**
(१)टोमॅटो (२)कांदा (३)वांगी (४)कोबी वर्गीय भाज्या

**प्र.९३-सोयाबीनच्या दान्यामध्ये .....प्रमाण अधिक असते.**
(१)पिष्टमय पदार्थापेक्षा स्निग्धांशाचे (२)स्निग्धांशापेक्षा पिष्टमय पदार्थाचे
(३)प्रथिनापेक्षा स्निग्धांशाचे (४)स्निग्धांशापेक्षा प्रथिनांचे

**प्र.९४-खालीलपैकी कोणता पाळीव प्राणी लागवड केलेल्या वृक्षांचा क्षत्रु समजला जातो?**
(१) गाय (२) म्हैस (३) बकरी (४) उंट

**प्र.९५-शेतजमीनीला जास्त झालेले प्राणी काढून टाकण्याच्या प्रध्दतीस म्हणतात.........**
(१)पाणी मुरणे (२)पाणी वाहून जाणे
(३)पाणी प्रवेश (४)पाण्याचा निचरा

**प्र.९६-जमिनीचे असे क्षेत्र, ज्याच्या पृष्टभागावरील जमा झा-लेले सर्व प्राणी एकाच चारीतून वाहून जाते........**
(१) लाभक्षेत्र (२) पाणलोट क्षेत्र
(३) पाणी भरण क्षेत्र (४) यापैकी नाही

**प्र.९७-पूर येणारा प्रक्षेत्रासाठी आणि पंप-चोरीची समस्या असलेल्या प्रक्षेत्रासाठी पाणी उपसण्याकरीता असलेल्या कोणता पंप जास्त उपयुक्त आहे?**
(१)सेन्ट्रिफ्युगल पंप (२)प्रॉपेलंट पंप
(३)सबमर्सिबल पंप (४)एयर पंप

**प्र.९८-गवती बांधा करिता खालीलपैकी कोणते गवत जास्त उपयुक्त आहे?**
(१)बिब्बा (२)मेहेंदी (३)कोरफड (४)खस

**प्र.९९-पर्शियन चक्राचा उपयोग होतो.......**
(१)अवजड पंप उचलण्यासाठी (२)वाहतूकीसाठी
(३)पाणी उपसण्यासाठी (४)'शक्तीमान' लष्करी ट्रकसाठी

**प्र.१००-फळपिकांमध्ये जमीन आच्छादनासाठी भुसा किंवा पालापाचोळा ..........वापरतात.**
(१)जलसंधाणाकरिता (२)जमिनीचा पृष्ठभाग झाकण्याकरिता
(३)प्रवाही पाण्याचा व्यय थांबविण्याकरिता

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे-** (१) २ (२) ४ (३) ३ (४) ४ (५) ६ (६) ४ (७) ३ (८) ३ (९) ३ (१०) २ (११) ४ (१२) २ (१३) २ (१४) १ (१५) ४ (१६) १ (१७) ३ (१८) ३ (१९) १ (२०) १ (२१) ३ (२२) २ (२३) ३ (२४) १ (२५) २ (२६) ३ (२७) १ (२८) १ (२९) ४ (३०) ३ (३१) ४ (३२) २ (३३) ४ (३४) ४ (३५) २ (३६) ३ (३७) २ (३८) ४ (३९) १ (४०) १ (४१) १ (४२) ४ (४३) १ (४४) १ (४५) १ (४६) १ (४७) ४ (४८) ४ (४९) ३ (५०) ४ (५१) ४ (५२) १ (५३) १ (५४) २ (५५) ४ (५६) ४ (५७) ३ (५८) ४ (५९) ३ (६०) ३ (६१) ३ (६२) १ (६३) ३ (६४) २ (६५) १ (६६) ३ (६७) ३ (६८) ३ (६९) ४ (७०) ४ (७१) १ (७२) १ (७३) ३ (७४) २ (७५) ३ (७६) १ (७७) ४ (७८) १ (७९) ४ (८०) ४ (८१) ४ (८२) ३ (८३) ४ (८४) ४ (८५) ४ (८६) ४ (८७) ४ (८८) १ (८९) २ (९०) ४ (९१) ४ (९२) २ (९३) ४ (९४) ३ (९५) ४ (९६) २ (९७) ३ (९८) ४ (९९) ३ (१००) १

## संक्षिप्त

### नवा मार्ग!

## १२ वी नंतर कॉमर्समध्ये करा करिअर



१२ वी कॉमर्सनंतर विद्यार्थ्यांसाठी बी.कॉम, CA, CS, CMA, BBA, bm, डाटा ॲनालिटिक्ससारख्या अनेक करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. योग्य दिशा आणि मेहनतीने यशस्वी भवितव्य घडवता येते.१२ वी कॉमर्स नंतर बऱ्याचदा विद्यार्थ्यांना प्रश्न पडतो की 'आता पुढे काय?' पण खरं पाहिलं तर कॉमर्स क्षेत्र हे केवळ आकड्यांपुरतं मर्यादित नसून, त्यात करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. योग्य दिशा आणि अभ्यासाच्या माध्यमातून यशस्वी भवितव्य घडवता येतं.

सर्वात सामान्य पण महत्त्वाचा पर्याय म्हणजे बी.कॉम पदवी. यात अकौंटिंग, इकॉनॉमिक्स, बिझनेस स्टडीज, टॅक्सेशन अशा विषयांचा अभ्यास होतो. बी.कॉम नंतर एम.कॉम, एमबीए, किंवा सीए, सीएससारखे प्रोफेशनल कोर्स करता येतात. हा सर्वाधिक प्रतिष्ठेचा अभ्यासक्रम मानला जातो. खउ-ख मार्फत घेण्यात येणाऱ्या या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी कठोर मेहनत लागते. पण एकदा का सीए झालं की, पगार आणि नोकरीच्या संधी खूप वाढतात.

कंपनी कायदे, सेक्रेटेरियल प्रॅक्टिसेस आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्स यांचा अभ्यास यात होतो. खउडख ही संस्था हा अभ्यासक्रम घेते. सीएस बनल्यानंतर तुम्ही कंपन्यांमध्ये वरिष्ठ पदांवर काम करू शकता. उच- म्हणजे आर्थिक नियोजन, कंट्रोलिंग आणि अकौंटिंग यामध्ये तज्ज्ञता मिळवणं. हे खउच-ख संस्था घेते. उत्पादन कंपन्यांमध्ये उच- साठी चांगल्या संधी असतात. ज्यांना व्यवस्थापन क्षेत्रात करिअर करायचं आहे, त्यांनी इइ- किंवा इइच् सारखा अभ्यासक्रम निवडावा. नंतर चइ- करून मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये नोकरी करता येते. कॉमर्ससोबत लॉ केल्यास तुम्ही कॉर्पोरेट लॉ, टॅक्स लॉ यामध्ये स्पेशलाइजेशन करू शकता. ही एक चांगली आणि भरभराट करणारी फील्ड आहे.

जोखीम व्यवस्थापन आणि आकडेमोडीचा खोल अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही एक स्पेशलाइज्ड फील्ड आहे. विमा कंपन्या आणि फायनान्शियल सल्लागार कंपन्यांमध्ये याची मोठी मागणी आहे. कॉमर्स आणि टेक्नॉलॉजी यांचा संगम असलेल्या या क्षेत्रात करिअर करायचं असल्यास, अल्पकालीन अभ्यासक्रम करून नोकरी मिळवता येते. १२ वी नंतर कॉमर्स क्षेत्रात करिअरच्या अनेक वाटा खुल्या आहेत. आपली आवड, कौशल्य आणि भविष्यातील उद्दिष्ट लक्षात घेऊन योग्य निर्णय घेतल्यास उज्वल करिअर निश्चितच घडू शकतं.

## मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अर्जाची ऑनलाईन प्रक्रिया १५ जूनपासून सुरु




**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना शासनाच्या महाडिबीटी प्रणालीद्वारे राबविण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाडीबीटी प्रणालीवर नविन तसेच नूतनीकरण अर्जासाठी ऑनलाईन स्वीकृती प्रक्रिया २५ जुलै २०२४ पासून सुरू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील नूतनीकरण अर्ज तसेच २०२४-२५ मधील नविन अर्ज सादर करण्यासाठी ३१ मे २०२५ पर्यंत अंतिम मुदत आहे. त्यानुसार शिष्यवृत्तीसाठी नवीन व नुतनीकरणाचे अर्ज महाडीबीटी पोर्टलद्वारे १५ जूनपासून ऑनलाईन स्वीकारण्यात येतील.सर्व महाविद्यालयांनी आपापल्या स्तरावर प्राप्त अर्जांची प्रथम प्राधान्याने पडताळणी करून ते ऑनलाईन पद्धतीने मंजूर करावेत. त्यानंतर संबंधित अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर यांच्या लॉगिनवर तत्काळ पाठवावेत.

कनिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासक्रम इ. ११वी, १२ वीसाठीचे (सर्व शाखा, एमसीव्हीसी, आयटीआय आदी) नवीन अर्ज व नुतनीकरणाचे प्राप्त अर्ज १५ जून ते १५ ऑगस्ट २०२५ या मुदतीत महाविद्यालयांनी ऑनलाईन अग्रेषित करावेत. वरिष्ठ महाविद्यालयातील बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम प्रथम, द्वितीय व तृतीय सर्व शाखा कला, वाणिज्य, विज्ञान आदींसाठी नवीन व नुतनीकरणाचे अर्ज १५ जून ते १० सप्टेंबर २०२५ पर्यंत महाविद्यालयांनी ऑनलाईन अग्रेषित करावेत.

वरिष्ठ महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रम (प्रथम, द्वितीय, तृतीय अंतिम वर्ष (सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम अभियांत्रिकी, वैद्यकीय व्यवस्थापन अभ्यासक्रम, फार्मसी व नर्सिंग अभ्यासक्रम) आदींचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज महाविद्यालयांनी १५ जून ते १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अग्रेषित करावेत.भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या लाभापासून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी वंचित राहणार नाहीत यांची दक्षता महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर सुनिता मते यांनी केले आहे.

# साऊथ इंडियन बँक लिमिटेडमध्ये भरती

साउथ इंडियन बँकेत जूनियर ऑफिसर पदासाठी देशभरातून अर्ज मागवले आहेत. ही कराराधारित विक्री नोकरी असून अर्जाची अंतिम दिनांक २६ मे २०२५ आहे. साउथ इंडियन बँक लिमिटेड ही एक खाजगी क्षेत्रातील अग्रगण्य बँक असून तिचे मुख्यालय केरळमधील त्रिशूर येथे आहे. या बँकेत जूनियर ऑफिसर/बिझनेस प्रमोशन ऑफिसर पदासाठी कराराधारित भरतीसाठी अर्ज मागवण्यात आले आहेत. ही नोकरी पूर्णतः टार्गेटवर आधारित असून भारतातील कोणत्याही नागरिकाला अर्ज करता येईल. अर्ज प्रक्रिया १९ मे २०२५ पासून सुरू झाली असून शेवटची तारीख २६ मे २०२५ आहे.




अर्ज फक्त अधिकृत वेबसाईटवरूनच करता येईल, इतर कोणत्याही माध्यमातून अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. ही भरती चांगल्या पगारासह करिअर संधी घेऊन आली आहे. यामध्ये एकूण वार्षिक पॅकेज ७.४४ लाख इतके असून कामगिरीनुसार प्रगतीची संधी उपलब्ध आहे. भविष्यात उमेदवाराला सहायक व्यवस्थापक (स्केल I) या पदावर नियमित कर्मचारी म्हणूनही पदोन्नती मिळू शकते.

या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय ३० एप्रिल २०२५ रोजी २८ वर्षांपेक्षा अधिक नसावे. मात्र, अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारांना वयोमर्यादेत ५ वर्षांची सूट देण्यात येते. निवड प्रक्रिया ऑनलाईन टेस्ट आणि वैयक्तिक मुलाखतीच्या स्वरूपात होणार आहे. पात्रता निकष पूर्ण केल्यामुळे थेट निवड होईलच असे नाही. अर्जांची संख्या आणि इतर घटक लक्षात घेऊन बँकेकडून शॉर्टलिस्टिंग केली जाईल.

अर्ज करण्यासाठी उमेदवाराने प्रथम अधिकृत वेबसाइटवर जाऊन वैध ईमेल आयडी आणि मोबाइल क्रमांकासह नोंदणी करावी. नंतर ऑनलाईन अर्ज काळजीपूर्वक भरावा कारण एकदा अर्ज सबमिट झाल्यावर त्यात कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही. अर्जासोबत फोटो, स्वाक्षरी, बायोडेटा आणि शैक्षणिक कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावी लागतील. अर्ज फी डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, UPI किंवा इंटरनेट बँकिंगच्या माध्यमातून ऑनलाईन भरावी लागेल. अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रिंटआउट आणि ई-ठशलशळर्ी भविष्यासाठी जतन करून ठेवावी. या पदाची सुरुवात करारावर आधारित असली तरी बँकेत नोकरी सुरू करण्यासाठी आणि अनुभव घेण्यासाठी ही एक उत्तम संधी आहे. इच्छुक उमेदवारांनी शेवटच्या तारखेपूर्वी www.southindianbank.com(http://www.southindianbank.com) या वेबसाइटला भेट देऊन लवकरात लवकर अर्ज करावा. यामुळे चांगल्या पगारासह बँकिंग क्षेत्रात भविष्यात स्थिर नोकरी मिळवण्याची संधी प्राप्त होईल.

## पंजाब ॲण्ड सिंध बँकेत रिलेशनशिप मॅनेजर भरती

पंजाब ॲण्ड सिंध बँकेत MSME रिलेशनशिप मॅनेजर पदासाठी भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. बँकेने यासाठी अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध केली असून एकूण ३० पदांसाठी अर्ज मागवले आहेत. ही भरती कंत्राटी पद्धतीने होणार आहे आणि पात्र उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा लागणार आहे. ही एक उत्तम संधी असून, बँकिंग क्षेत्रातील चडचए विभागात अनुभव असणाऱ्या पदवीधरांसाठी खास आहे.या भरतीसाठी अर्ज प्रक्रिया २९ मे २०२५ पासून सुरू होणार असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख १८ जून २०२५

Punjab & Sind Bank
(A Govt. of India Undertaking)

आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी पात्रता निकष, वयोमर्यादा, आवश्यक कागदपत्रे आणि इतर अटी काळजीपूर्वक वाचूनच अर्ज करावा. अर्ज करण्यासाठी बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावर पिंिक्षरलरपवीळपवलरपज्ञ.ले.ळप वर जाऊन नोंदणी करावी लागेल. त्यानंतर अर्ज फॉर्म भरून, आवश्यक कागदपत्रांची स्कॅन कॉपी अपलोड करून शुल्क भरणे आवश्यक आहे. ऑफलाइन पद्धतीने कोणताही अर्ज स्वीकारला जाणार नाही.शुल्काची बाब विचारात घेतली तर, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग उमेदवारांसाठी शुल्क १०० इतके आहे, तर सामान्य, ईडब्ल्यूएस आणि ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांसाठी ८५० शुल्क ठेवण्यात आले आहे. शुल्क भरताना जीएसटी आणि अतिरिक्त सेवा शुल्क लागेल.या भरतीअंतर्गत रिक्त पदांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे: अनुसूचित जाती: ४, अनुसूचित जमाती: २, ओबीसी: ८, ईडब्ल्यूएस: ३ आणि अनारक्षित: १३. एकूण पदांची संख्या ३० आहे. शैक्षणिक पात्रतेसाठी उमेदवार किमान पदवीधर असावा आणि त्याचबरोबर किमान तीन वर्षांचा चडचए बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक आहे. वयोमर्यादा ही १ मे २०२५ रोजी २५ ते ३३ वर्षांच्या दरम्यान असावी. म्हणजे उमेदवाराचा जन्म २ मे १९९२ ते १ मे २००० या कालावधीत झाला असावा. शासकीय नियमांनुसार राखीव प्रवर्गांना वयोमर्यादेत सवलत लागू आहे. निवड प्रक्रिया ही लेखी परीक्षा (गरज भासल्यास), स्क्रीनिंग, मुलाखत, कागदपत्र पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी अशा टप्प्यांतून होणार आहे.

## यश मिळण्यासाठी अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो

स्पेनमध्ये जन्मलेले पिकासो हे एक महान चित्रकार होते. त्यांच्या कलाकृती जगभर कोट्यावधी रुपयांना विकल्या जात असत. एके दिवशी ते रस्त्यावरून चालत असताना एक महिला त्यांना ओळखते आणि त्यांच्याजवळ येऊन विचारते, सर मी तुमची खूप मोठी फॅन आहे. तुम्ही काढलेली चित्रे मला ार आवडतात. तुम्ही माझ्यासाठी एक पेन्टिंग बनवून द्याल? पिकासो हसले आणि म्हणाले, चित्र काढण्यासाठी आत्ता माझ्याकडे काहीच साहित्य नाही. नंतर कधी तरी तुमच्यासाठी पेन्टिंग बनवून देईन. ती महिला खूपच आग्रह करू लागली.आत्ताच पेन्टिंग बनवून द्या. परत तुमची भेट होईलच याची मला खात्री वाटत नाही.त्या महिलेचा आग्रह त्यांना मोडता येईना. मग त्यांनी खिशातून एक कागद काढला आणि पेनाने त्यावर काही काढू लागले. केवळ दहाच सेकंदात त्यांनी कामचलाऊ चित्र काढले. त्या महिलेला ते म्हणाले, हे पहा तुझ्यासाठी बनवलेले चित्र.याची किंमत किती तरी लाख डॉलर आहे.ती ते पेन्टिंग घेऊन घरी आली. तिला वाटले की, पिकासो आपल्याला मूर्खात काढत आहेत. या पेंन्टिंगची किंमत लाखो डॉलर असणेच शक्य नाही. मग ती चित्रकलेतील तज्ञ व्यक्तींकडे गेली. चित्रांची खरेदी-विक्री करणाऱ्या एजंटक़डे चौकशी केली. सगळ्यांनी ते चित्र लाखो डॉलर किंमतीचे असल्याचे सांगितले. हे ऐकून तिला खरोखरच मोठे आश्चर्य वाटले. ती परत पिकासोंकडे गेली आणि त्यांना म्हणाली, सर, तुम्ही म्हणत होता ते खरेच आहे. या पेन्टिंगची किंमत खरोखरच लाखो डॉलर आहे.त्यावर पिकासो म्हणाले, ते तर मी आधीच सांगितले होते.ती म्हणाली, सर मला तुमची विद्यार्थीनी व्हायचे आहे आणि पेन्टिंग शिकायचे आहे.तुम्ही ज्याप्रमाणे दहा सेकंदात लाखो डॉलर किंमतीची पेंटिंग बनलली त्याप्रमाणे मला बनवता यावी असे मला वाटते.पिकासो हसले आणि म्हणाले, मी दहा सेकंदात जी पेन्टिंग बनवली ती शिकण्यासाठी मला ३० वर्षे लागली. तू देखील आयुष्यातील तीस वर्षे खर्च केलीस तर तुलाही अशी पेन्टिंग बनवता येतील.ती महिला अवाक होऊन त्यांच्याकडे पहात राहिली.मित्रांने जेव्हा आपण दुसऱ्याचे यश बघतो तेव्हा असे वाटते की, अरेच्च्या या व्यक्तीला तर खूपच लवकर आणि सहजपणे यश मिळाले आहे. पण त्या यशामागे किती वर्षांचे कष्ट आहेत हे जाणून घेण्याची कुणाचीही इच्छा नसते.यश तर मिळते पण त्यासाठी अनेक गोष्टींचा त्याग करावा लागलेला असतो.यश मिळण्याच्या तयारीतच निम्मे आयुष्य खर्च करावे लागते.

## दहावी-बारावीतील गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणार ३० हजारांचं रोख पारितोषिक

दहावी-बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना 'राघोजी भांगरे गुणगौरव योजना'अंतर्गत ५ ते ३० हजार रुपयांपर्यंत रोख पारितोषिक दिले जाणार आहे.

इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने 'राघोजी भांगरे गुणगौरव योजना' सुरू केली आहे. या योजनेत राज्यातील गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना रोख पारितोषिक दिले जाणार आहे. ही योजना राज्य, अपर आयुक्त आणि प्रकल्प कार्यालय या तीन स्तरांवर राबविली जात आहे.

कॉलेजमध्ये दोनदा नापास, तरीही बनले ख-ड अधिकारी; अनुराग कुमार यांची प्रेरणादायी कहाणी, वाचलीत का?



दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ५ हजार ते ३० हजार रुपयांपर्यंत रोख बक्षीस देण्यात येणार आहे. राज्यातील अनेक शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य मॉडेल स्कूल, सैनिकी शाळा आणि नामांकित शाळांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी यंदा परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. राज्य शिक्षण मंडळ व केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न शाळांतील विद्यार्थ्यांचा यात समावेश आहे. या योजनेअंतर्गत दहावी आणि बारावी (कला, वाणिज्य, विज्ञान) शाखेतील प्रत्येकी पाच गुणवंत मुला-मुलींना सन्मानित केले जाणार आहे.

गुणवत्तेनुसार प्रथम क्रमांक मिळवणाऱ्याला राज्य स्तरावर ३० हजार, अपर आयुक्त स्तरावर १५ हजार आणि प्रकल्प कार्यालयात १० हजार रुपये मिळतील. द्वितीय क्रमांकासाठी अनुक्रमे २५ हजार, १० हजार व ७ हजार, तर तृतीय क्रमांकासाठी २० हजार, ७ हजार व ५ हजार रुपये दिले जातील. चौथा क्रमांक मिळवणाऱ्याला १५ हजार आणि पाचव्या क्रमांकासाठी १० हजार रुपये मिळणार आहेत. या योजनेत सीबीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ नसल्यामुळे वगळण्यात आले आहे.

मात्र, राज्य मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांतील प्रत्येकी २४ गुणवंत विद्यार्थ्यांना दहा महिन्यांसाठी दरमहा एक हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. याशिवाय, शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील प्रथम क्रमांकाच्या तीन विद्यार्थ्यांना प्रकल्प व अपर आयुक्त स्तरावर गौरविण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणजे १०० टक्के निकाल लागलेल्या आश्रमशाळांचा तसेच त्यांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांचा सुद्धा विशेष सत्कार केला जाणार आहे. ही योजना विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेबाबतची आवड निर्माण करण्यास उपयुक्त ठरणार आहे.

## NEET PG 2025: परीक्षा होणार एकाच सत्रात

NEET PG परीक्षा २०२५ बाबत कोर्टाने निर्णय जाहीर केला आहे. मुळात, यंदाची परीक्षा १५ जून २०२५ रोजी जाहीर करण्यात आली असून, परीक्षा एकाच सत्रात घेण्यात येणार आहे.

NEET PG 2025 साठी तयारी करत आहात? मग या बातमीवर लक्ष द्या. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे निणय जाहीर केला आहे की यंदाची NEET PG परीक्षा एकाच सत्रात घेण्यात येणार आहेत. ही परीक्षा दोन शिफ्टमध्ये घेण्याच्या राष्ट्रीय परीक्षा मंडळाच्या (NBE) निर्णयाला न्यायालयाने नकार दिला आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ, संजय कुमार आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने यासंदर्भात निर्णय दिला. दोन सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात आल्यास विद्यार्थ्यांमध्ये असमानता निर्माण होते, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

वेगवेगळ्या सत्रांमध्ये प्रश्नपत्रिकांचा कठीणपणा वेगळा असतो, त्यामुळे सर्व उमेदवारांना समान संधी मिळत नाही. एनबीईने असे सांगितले होते की देशभर एकाच वेळी परीक्षा घेण्यासाठी पुरेशी केंद्रे उपलब्ध नाहीत. मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळला आणि म्हटले की, देशात पुरेशा तंत्रज्ञानाची उपलब्धता आहे आणि अशा परीक्षा एकाच वेळेस पार पाडणे शक्य आहे.



२०२४ मध्ये काही विद्यार्थ्यांनी परीक्षा प्रक्रियेतील अपारदर्शकतेवर आक्षेप घेत याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने २२ मे रोजी सर्व खासगी आणि डीम्ड वैद्यकीय महाविद्यालयांना त्यांची फी माहिती सार्वजनिक करण्याचे निर्देश दिले होते. याच निर्णयात एकाच सत्रात परीक्षा घेण्यावर भर देण्यात आला. छएएढ झॠ २०२५ ही परीक्षा १५ जून २०२५ रोजी संगणक आधारित पद्धतीने (CBT) पार पडणार आहे. पूर्वी दोन शिफ्टमध्ये परीक्षा होणार होती, मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे आता ती फक्त एका सत्रात घेतली जाईल.

ख-ड परी बिश्नोईची प्रेरणादायी कहाणी! पहिल्याच प्रयत्नात नाही मिळालं यश, पण तिसऱ्या प्रयत्नात मिळवली ऑल इंडिया ३० वी रँक

टेस्ट सिटी स्लिप २ जून २०२५ रोजी जाहीर करण्यात येणार आहे. तसेच प्रवेशपत्र ११ जून २०२५ रोजी जाहीर करण्यात येईल. परीक्षा १५ जून २०२५ घेण्यात येणार आहे. तसेच परीक्षेचा निकाल १५ जुलै २०२५ पर्यंत जाहीर करण्यात येईल अशी अपेक्षा वर्तवण्यात आली आहे. परीक्षेची वेळ ३ तास ३० मिनिटे असेल. एकूण २०० बहुपर्यायी प्रश्न विचारले जातील. प्रत्येक योग्य उत्तराला ४ गुण दिले जातील, तर चुकीच्या उत्तरासाठी १ गुण वजा केला जाईल. या निर्णयामुळे अनेक विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून, आता सर्व उमेदवारांना न्याय्य व समान संधी मिळणार आहे.

## यशासाठी प्रतिसादही महत्त्वाचा

शाळेत असताना आम्हाला हेलन केलर बद्दल एक धडा होता. प्रत्येक धड्याच्या शेवटी आम्हाला त्या धड्याशी संबंधित एक कार्य करावे लागायचे. हेलन केलरचा धडा जेव्हा संपला, तेव्हा आमच्या शिक्षकानी आमच्या वर्गातील सर्व मुलांना खेळाच्या मैदानावर नेले.

त्यांनी आम्हाला सांगितले की १० मिनिटे सगळ्यांनी डोळे बंद करून मैदानावर चालण्याचा प्रयत्न करायचा आहे. आमच्यासाठी हे खेळासारखं होतं. १० मिनिटांनंतर आमच्या शिक्षकाने आम्हाला डोळे उघडायला सांगितले. त्यांनी आम्हाला सांगितले की हेलन केलरचं जग कसे होते, हे समजणे कठीण असले तरी आज आपण तिचे जीवन समजून घेण्यासाठी एक पाऊल उचलले. इतरांना समजून घेण्यासाठी आपल्याला आपल्या मर्यादांची जाणीव असणे महत्वाचे आहे. समोरच्या व्यक्तीला समजून घेण्यासाठी ऐकणे आणि प्रतिसाद देण्यासाठी ऐकणे यातील फरक समजून घ्या. प्रतिसाद देण्याची घाई करू नका.

कारण न जाणता जेव्हा तुम्ही प्रतिसाद देता त्यावेळी तो चुकीचा असण्याची शक्यता असते. त्यामुळे समजून उमजून प्रतिसाद देणे गरजेचे असते.यातून अनेकदा मिळणारे यश दूर जाते. कारण यश मिळवायचे असेल तर अनेकदा सांघिक प्रयत्न गरजेचे असतात. किंवा अनेकदा दुसऱ्यांच्या कामगिरीवर तुमचे यश अवलंबून असते. अशा वेळी प्रतिसाद हा महत्वाचा ठरतो.त्याचप्रमाणे आपल्या पूर्वग्रहांबद्दल जाणून घ्यायला शिका. जेव्हा आपण आवाज ओळखण्यात सक्षम होतो तेव्हा आपण फक्त ऐकतो. पण आपण खरंच तेव्हा ऐकतो जेव्हा आपण त्याचा अर्थ काय आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न करतो. यासाठी केवळ लक्ष केंद्रित करणे पुरेसे नाही, पण त्या शब्दांमागील अनुभव, हेतू आणि भावना यांना सामोरे जाण्याची प्रतिबद्धता देखील आवश्यक आहे.समोरच्याचे समजून घेणे, तो काय सांगत आहे हे ऐकणे एखाद्यासाठी भीतीदायकही असू शकते. कारण कदाचित समोरच्याच्या सांगण्यात आपण टाळत असलेल्या गोष्टी आपल्याला अनपेक्षितपणे सापडतात.




# NTPC १२० उपव्यवस्थापक पदाकरीता भरती

भारतातील सर्वात मोठी वीज कंपनी, उपव्यवस्थापक पदांसाठी भरती जाहीर केली आहे. ही भरती मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि कंट्रोल अ‍ॅन्ड इन्स्ट्रुमेंटेशन (CI) या तीन शाखांसाठी असून, या माध्यमातून अनुभवी उमेदवारांना प्रतिष्ठित राष्ट्रीय ऊर्जा प्रकल्पात काम करण्याची संधी मिळणार आहे. NTPC ही सरकारी क्षेत्रातील महत्त्वाची कंपनी असून, ऊर्जा निर्मितीत तिचे मोठे योगदान आहे.

जाहिरात क्रमांक १०/२५ अंतर्गत एकूण १२० पदांसाठी ही भरती होणार आहे. इच्छुक उमेदवारांसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया २६ मे २०२५ पासून सुरू झाली असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख ९ जून २०२५ आहे. सर्व अर्ज फक्त अधिकृत वेबसाइटवर careers.ntpc.co.in qH$dm ntpc.co.in च्या उरीशशीी विभागातून ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारले जाणार आहेत. अर्ज करताना उमेदवारांनी सर्व आवश्यक माहिती काळजीपूर्वक भरावी आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

या भरतीसाठी वयोमर्यादा १८ ते ४० वर्षांदरम्यान निश्चित करण्यात आली आहे. वयाची गणना ९ जून २०२५ या तारखेआधारे केली जाणार आहे. राखीव प्रवर्गातील उमेदवारांना शासनाच्या नियमांनुसार वयात सवलत दिली जाईल. NTPC उपव्यवस्थापक भरती प्रक्रियेत उमेदवारांची निवड शॉर्टलिस्टिंगच्या आधारे होणार आहे. त्यानंतर मुलाखत, कागदपत्रांची पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी असे टप्पे असणार आहेत. भरती प्रक्रियेतील पारदर्शकता आणि गुणवत्तेचा उच्च दर्जा राखण्यासाठी NTPC विशेष लक्ष देत असते.



उमेदवारांनी अधिकृत वेबसाइटवर दिलेल्या सूचनांचे पालन करून अर्ज सादर करावा. चुकीची माहिती भरल्यास किंवा कागदपत्रे अपूर्ण असल्यास अर्ज फेटाळला जाऊ शकतो. NTPC मध्ये काम करण्याची ही एक मोठी संधी असून पात्र उमेदवारांनी ती नक्कीच साधावी. या भरतीसंदर्भात अधिक माहितीसाठी जाहीर अधिसूचनेचा आढावा घ्यावा. तसेच संकेतस्थळावर Visit करावे.

# राष्ट्रपतींच्या हस्ते जळगावच्या सुजाता बागुल यांचा राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने सन्मान

**नौकरी एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी**/जळगाव जिल्ह्यातील कठोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या सहायक परिचारिका सुजाता अशोक बागुल यांना राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झालेल्या समारंभात राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने आरोग्य क्षेत्रात निस्वार्थ वृत्तीने सेवा देणाऱ्या १५ परिचारिका आणि परिचारकांचा गौरव करण्यात आला.



या सोहळ्यात केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अनुप्रिया पटेल आणि आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा उपस्थित होते.

आरोग्य क्षेत्रात गेली १८ वर्षे अत्यंत निष्ठा, कष्ट व समर्पित भावनेने सेवा बजावणाऱ्या सुजाता बागुल यांनी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संस्थात्मक प्रसवासाठी गरोदर महिलांना प्रोत्साहन देणे, लसीकरणाचे शंभर टक्के उद्दिष्ट साध्य करणे, आरोग्य शिबिरे, जनजागृती रॅली आणि स्वच्छता मोहिमांमध्ये प्रभावी सहभाग यांसारखे उपक्रम त्यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आले आहे.कोरोना काळातील त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी त्यांना जिल्हास्तरीय 'फ्लोरेन्स नाइटिंगेल'सह विविध पुरस्कारांनी ही सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्काराचे स्वरुप एक लाख रुपये रोख आणि प्रशस्तीपत्र आहे.

# जगातील सर्वात शक्तिशाली रॉकेट स्टारशिपची ..पान ६ वरून..

ज्यामुळे किरकोळ नुकसान झाले. आजच्या उड्डाणानंतर स्टारशिपचे तुकडे कुठे पडले हे स्पष्ट नाही. ऋ-- ने देखील याबद्दल अद्याप काहीही सांगितले नाही.

स्टारशिप मानवांना मंगळावर घेऊन जाईल

हे प्रक्षेपण महत्वाचे आहे कारण हे अंतराळयान मानवांना आंतरग्रहीय बनवेल. म्हणजेच, त्याच्या मदतीने, पहिल्यांदाच मानव पृथ्वीशिवाय इतर ग्रहावर पाऊल ठेवेल. मस्क २०२९ पर्यंत मानवांना मंगळावर घेऊन जाऊ इच्छितात आणि तेथे वसाहत स्थापन करू इच्छितात. हे अंतराळयान एका तासापेक्षा कमी वेळात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात मानवांना घेऊन जाऊ शकेल.

मंगळावर वसाहत स्थापन करण्याची काय गरज आहे?

मंगळावर वसाहत स्थापन करण्याच्या गरजेबद्दल, मस्क म्हणतात की, 'पृथ्वीवरील जीवन संपवण्याच्या घटनेमुळे मानवतेचा अंत होऊ शकतो, परंतु जर आपण मंगळावर आपला तळ बांधला तर मानवता टिकू शकेल.' लाखो वर्षांपूर्वी, पृथ्वीवरील डायनासोर देखील जीवन संपवण्याच्या घटनेमुळे नष्ट झाले होते. त्याच वेळी, प्रोफेसर स्टीफन हॉकिंग यांनी २०१७ मध्ये असेही म्हटले होते की जर मानवांना जगायचे असेल तर त्यांना १०० वर्षांच्या आत विस्तार करावा लागेल.

## CBSE विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी!


# South Asian University, दिल्लीमध्ये प्रवेश सुरु

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी आहे. South Asian Universit ने प्रवेश प्रक्रियेचे आयोजन दिल्लीमध्ये केले आहे.केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) ने आपल्या सर्व संलग्न शाळांना कळवले आहे की South Asian University (SAU), नवी दिल्ली येथे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. हे विद्यापीठ भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या आर्थिक सहाय्याने स्थापन करण्यात आले असून, भारतासह आठ SAARC देशांनी संयुक्तपणे याची स्थापना केली आहे.

ड-ण चे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे दक्षिण आशियाई विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे उच्च शिक्षण देणे. येथे मिळणाऱ्या पदव्या SAARC देशांमध्ये वैध आहेत. उइडए चे विद्यार्थी भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षण घेऊ इच्छित असतील, तर ही एक उत्तम संधी आहे. याशिवाय गुणवत्ताधारक आणि गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व आर्थिक मदतही उपलब्ध होईल. SAU मध्ये अंडरग्रॅज्युएट, पोस्टग्रॅज्युएट आणि पीएच.डी. स्तरावरील अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. प्रमुख कोर्सेसमध्ये कम्प्युटर सायन्स, मॅथेमॅटिक्स, बायोटेक्नोलॉजी, व्यवस्थापन (BBA-MBA), कायदा (LLM²), अर्थशास्त्र, समाजशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध, हवामान बदल व शाश्वत विकास यांचा समावेश आहे.

नवीन काळाच्या मागणीनुसार विद्यापीठात AI, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी यांसारख्या आधुनिक कोर्सेसही सुरू करण्यात आले आहेत.यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर करिअरच्या संधी प्राप्त होऊ शकतात. SAU चे Virtual Campus Programs देखील आहेत, जे दूरस्थ विद्यार्थ्यांसाठी खास डिझाईन केलेले आहेत. या कार्यक्रमांत BCA (Hons.), BBA (Hons.), BS in Data Science -I, MCA, MBA, संगीत, फॅशन, शॉर्ट डिझाईन कोर्सेस इ. समाविष्ट आहेत.

विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी CUET, JEE, CAT, GMAT, NET यांसारख्या राष्ट्रीय परीक्षांवरून किंवा थेट प्रवेशाद्वारे संधी दिली जाते. विशेषतः CBSE चे गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्तीचे लाभार्थी ठरतात, जेणेकरून आर्थिक अडचणीमुळे शिक्षणात अडथळा येणार नाही. प्रवेशासाठी अंतिम दिनांक डायरेक्ट मोडसाठी २



जून २०२५ आणि Virtual Campus साठी १९ जून २०२५ आहे. अधिक माहितीसाठी www.sau.int या संकेतस्थळावर भेट द्यावी किंवा admissionssau.int व admissionsvc.sau.int या ईमेलवर संपर्क साधावा.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2010/34125
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813